- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

सोने-चांदी
- २४ कॅरेट : १,५२,७०० /-
- २३ कॅरेट : १,५२,३५० /-
- चांदी : २,४८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : सोमवार, ५ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २९६ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# ज्ञानेश कुमार चले जाव !

## संपूर्ण देशात १३ कोटी मतदारांची नावं यादीतून वगळली

**वृत्तसंस्था, मुंबई**

एसआयआरच्या नावाखाली राज्यातील जवळपास दोन कोटी तर संपूर्ण देशात १३ कोटी मतदारांची नावं यादीतून वगळली आहेत. भारतीयांना मतदानाचा अधिकार नाकारण्याचा अधिकार कोणालाही नाही. देशाच्या सीमा तुमच्या हातात आहेत. मग बांगलादेशी भारतात, महाराष्ट्रात येतोच कसा, एसआयआरमधून किती बांगलादेशी पकडले, असा सवाल करत बांगलादेशींच्या नावाखाली देशातील नागरिकांचा मतदानाचा अधिकार काढून घेतला जात असेल तर आम्ही गप्प बसणार नाही. यंत्रणांना हाताशी धरून कोणी हुकुमशाह होत असेल तर ही हुकूमशाही गाडून टाकू, असा इशारा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिला.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना( उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी, मेट्रो सिनेमा ते मुंबई महानगरपालिकेपर्यंत गर्जना मोर्चा काढण्यात आला. मुंबई महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारासमोर या मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. या मोर्चात शिवसेनेचे खासदार संजय राऊत, अरविंद सांवत, आमदार अनिल परब, भास्कर जाधव, शिवसेना नेते सुभाष देसाई, माजी खासदार चंद्रकांत खैरे, प्रवक्त्या सुषमा अंधारे, मनसे नेते बाळा नांदगावकर, अमित ठाकरे, शर्मिला ठाकरे, राष्ट्रवादीचे जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, शेकापचे जयंत पाटील आदी नेतेमंडळी उपस्थित होते. कोणताही राजकीय झेंडा न घेता सर्व कार्यकर्ते व तरुणाईंनी तिरंगा हातात घेऊन मोर्चात सहभागी झाले होते.



मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात ठाकरे बंधूंच्या नेतृत्वाखाली आज सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. महापालिकेसमोर या मोचार्चे सभेत रूपांतर झाले. यावेळी बोलताना शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर, मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणावर आणि केंद्रातील मोदी सरकारवर जोरदार टीका केली. आमचा लढा कोणत्याही एका पक्षाचा, व्यक्तीचा, जात-पात किंवा धमार्चा नाही. हा आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा आणि लोकशाहीच्या रक्षणाचा लढा आहे. मोदीजी जेव्हा पहिल्यांदाच पंतप्रधान झाले, तेव्हा त्यांनी मेक इन इंडियाची घोषणा दिली होती. आम्हाला ती मान्य आहे; मात्र मेक इन इंडियाच्या नावाखाली आपल्या देशात हुकूमशाही बनणार असेल, तर त्यांना याच देशात गाडून टाकण्यासाठी आम्ही उभे राहिले आहोत.

देशभरातील मतदारांची नावे वगळल्याचा आरोप करत निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर ठाकरेंनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्यात जवळपास दोन कोटी तर संपूर्ण देशात १३ कोटी मतदार वगळले आहेत. म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राच्या लोकसंख्येएवढ्या लोकांना मतदार यादीतून बाहेर काढले गेले. भारतीयांना मतदानाचा अधिकार नाकारण्याचा प्रकार आहे, असे ठाकरे म्हणाले. गृहमंत्री अमित शहा निवडणूक आयोगाच्या मदतीने लोकांचे नागरिकत्व काढून घेत आहेत. हिटलर हुकूमशाह होता आणि तो कुणालाच घाबरत नव्हता. मात्र, अशी वेळ आली की त्याला स्वतःवरच गोळी झाडून घ्यावी लागली. त्याच्यानंतर त्याला मदत करणाऱ्यांना काय काय भोगावे लागले, हे सर्वांनी लक्षात ठेवावे, असा सूचक इशारा उद्धव ठाकरे यांनी प्रशासनातील लोकांना दिला.

**ज्ञानेश कुमार यांची नियुक्तीच बेकायदा ?**

निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीच्या पद्धतीवरही ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केला. ज्या व्यक्तीवर संपूर्ण देशाच्या निवडणुकीची जबाबदारी आहे, त्यांची नियुक्तीच जर पक्षपाती पद्धतीने झाली असेल तर निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेवर प्रश्न उपस्थित होणारच, असे ठाकरे म्हणाले. ज्ञानेश कुमार यांची नियुक्तीच बेकायदा आहे, असा आरोप ठाकरेंनी त्यांनी केला.

**एसआयआर रद्द करा, ईव्हीएमदेखील हटवा**

देशात सत्ता कोणाची याचा निर्णय मतदारांनी घ्यायचा असतो, निवडणूक आयोगाने नाही. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक असेल तर उद्या कोणाचीही सत्ता आली तरी आम्हाला फरक पडत नाही; मात्र सत्ता योग्य मागार्ने आली पाहिजे असा इशारा देत मतदार याद्यांचे सुरू असलेले विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) तातडीने रद्द करा आणि पुढील निवडणुका ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेवर घ्याव्यात, अशी जोरदार मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली.

---

थोडक्यात

### बिबट्याने केले चिमुरड्याला ठार

सातारा जिल्ह्यातील न्हाळेवाडी परिसरात गेल्या ३ महिन्यांपासून वावरणाऱ्या बिबट्याने आज रात्री साडेसातच्या सुमारास वस्तीतून जय संदीप खंडागळे या दोन वर्षाच्या चिमुरड्याला उचलून नेले. संध्याकाळी वीजपुरवठा खंडित झालेला असताना अंधाराचा फायदा घेत बिबट्याने हा हल्ला चढवला.आणि ५०० मीटर ओढत उसाच्या शेतामध्ये घेऊन गेला असता ग्रामस्थांनी पाठलाग करून बाळाला सोडवले, मात्र गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. नहाळेवाडी, शिवथर,कोलवडी, मालगाव या परिसरात वारंवार बिबट्या दिसत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी करूनही वनविभागाने दुर्लक्ष केल्याने हा प्रकार घडला असल्याने ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त होत असून बिबट्याला तात्काळ जेरबंद करण्याची मागणी होत आहे.

### सोने चांदीच्या दरात घसरण सुरुच

अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढलेल्या संघषार्मुळं सोने आणि चांदीच्या दरात मोठी घसरण गेल्या आठवड्यात पाहाचला मिळाली. मल्टी कमोडिटी एक्सचेंज ते सराफा बाजारात सोने आणि चांदीचे दर घसरले आहेत. वायदेबाजारात चांदीचे दर ९ हजार रुपयांनी तर सराफा बाजारात दर ११ हजार रुपयांनी कोसळले आहेत. उच्चांकाच्या तुलनेत चांदीचे दर १ लाख ९० हजार रुपयांनी कमी झालेत तर सोन्याचे दर देखील घसरले आहेत. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर ४ डिसेंबरच्या वायद्याचे एक किलो चांदीचे दर २३४६९६ रुपयांवरुन २ लाख २५ हजार ५४५ रुपयांवर आले आहेत.

---

## एमपीएससीच्या अध्यक्षासह सर्व सदस्यांना बरखास्त करा : आ. संजय गायकवाड

**दै. सिंहवाणी वृत्त, बुलडाणा**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाचा कारभार आणि पेपर फुटीवरून राज्यात वादळ निर्माण झाले आहे. यावरून विरोधी पक्षांनी राज्यात रान उठविले असून पुणे येथे विध्यार्थ्यांचे (उमेदवारांचे) ठिय्या आंदोलन सुरु आहे. यामुळे विधानपरिषद निवडणुकीच्या काळात घमासान सुरु असताना शिवसेना शिंदे गटाचे बुलढाणा विधानसभा मतदारसंघांचे आक्रमक आमदार संजय गायकवाड यांनी आज एमपीएससीचा एकूण कारभार, कार्यपद्धती, वारंवार होणारे पेपरफुटीचे प्रकार यावर गंभीर सवाल उपस्थित करीत आरोपांचे बॉम्बच टाकले आहे. हा राज्यातील महायुती सरकारला घरचा अहेर समजला जात असून यामुळे राज्यात वादंगाचे महावादळ निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.



बुलडाणा येथील आपल्या जन संपर्क कार्यालयात रविवारी आमदार गायकवाड यांनी प्रसिद्धी माध्यम प्रतिनिधी सोबत संवाद साधला. भरगच्च पत्र परिषदेत बोलताना त्यांनी केवळ एमपीएससीचे अध्यक्षच नव्हे तर सर्व सदस्य यांना बरखास्त करण्याची मागणी करुन एकच खळबळ उडवून दिली. अध्यक्षच नव्हे बहुतेक सदस्यांचा कारभार संशयाच्या भोवऱ्यात असल्याचा आरोप करुन मेरिट विध्यार्थ्यांचे होणारे नुकसान, त्यांचे अडचणीत आलेले भवितव्य लक्षात घेता आपण जवाबदारीने हे विधान, ही मागणी करीत असल्याचे ते म्हणाले. मी सरकारमध्ये असलो, सत्ताधारी पक्षाचा आमदार असलो तरी सत्य बाहेर येणे, सत्य जाहीर करणे काळाची गरज आहे. आपण यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पुराव्यानिशी तक्रार करणार असल्याचे आमदार गायकवाड यांनी ठणकावून सांगितले.

**त्या सदस्यांची सखोल चौकशी करा**

यावेळी आमदार गायकवाड यांनी छत्रपती संभाजीनगरशी संबंधित एमपीएससीच्या सदस्यावर गंभीर आरोप करून त्यांची उच्च स्तरीय चौकशी करण्याची मागणी केली. मागील २०१८ पासून ते आजतागायत हे राज्य लोकसेवा आयोगात सदस्य म्हणून कार्यरत आहे.

हे सर्व दीर्घ काळ सदस्य म्हणून कार्यरत असून त्यांच्या कार्यकाळात कथितरित्या मोठे घोळ झाल्याचा गंभीर आरोप गायकवाड यांनी केला. या सदस्यांची कोटयवाधीची संपत्ती असून त्यांच्या दूरध्वनीचे सीडीआर तपासण्याची आणि संपत्तीची चौकशी करावी अशी मागणी गायकवाड यांनी केली. या सदस्यांचा मोठा प्रभाव असून त्यांच्या ईशा-यावर ठराविक लोकांकडेच उमेदवारांचे पेपर तपासणी करिता जातात असा आरोपही आमदारांनी केला. त्यामुळे पेपर फूट सारखा पेपर तपासणीचा देखील मोठा घोळ असल्याचे ते म्हणाले.

---

## शहीद जवानाचे पार्थिव घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेचा अपघात

### चालक आणि दोन नातेवाइकांसह चार जणांचा मृत्यू

**वृत्तसंस्था, चंदीगड**

चंदीगडहून शहीद सुभेदार मेजर सत्यवान यांचे पार्थिव मूळ गावी देवरिया येथे घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेचा पूर्वांचल एक्स्प्रेसवेवर भीषण अपघात झाला आहे. हलियापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत किलोमीटर ७९.६ जवळ एका अज्ञात वाहनाने रुग्णवाहिकेला जोरदार धडक दिली. या हृदयद्रावक अपघातात शहीद जवानाचा मुलगा, चालक आणि दोन नातेवाइकांसह चार जणांचा मृत्यू झाला आहे.

शहीद जवानाच्या अंत्यदर्शनापूर्वीच कुटुंबातील मुलासह अन्य सदस्यांवर काळाने घाला घातल्याने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी सुमारे ८:१५ वाजता रुग्णवाहिका शहीद सुभेदार मेजर सत्यवान (रा. गैला दुधिला, ता. रुद्रपूर, जि. देवरिया) यांचे पार्थिव घेऊन चंदीगडहून गावाकडे निघाली होती. पूर्वांचल एक्स्प्रेसवेवरील किमी ७९.६ जवळ एका भरधाव अज्ञात वाहनाने रुग्णवाहिकेला जोरदार धडक दिली. या धडकेत शहिदांचा मुलगा गौरव सिंह आणि रुग्णवाहिका चालक जसपाल यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

**उपचारादरम्यान दोघांनी प्राण सोडले**

अपघातात शहिद जवानाचे भाऊ राजन चौधरी आणि पुतण्या राम समुझ सिंह गंभीर जखमी झाले होते. पोलिसांनी त्यांना तातडीने पिठला कुमारगंज येथील रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारादरम्यान या दोघांचीही प्राणज्योत मालवली. एकाच वेळी कुटुंबातील चार सदस्यांचा मृत्यू झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

**शहिदांचे पार्थिव सुरक्षित; पोलिसांकडून तपास सुरू**

अपघातानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतले असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. शहीद सुभेदार मेजर सत्यवान यांचे पार्थिव स्थानिक पोलिस ठाण्यात पूर्ण सन्मानासह सुरक्षित ठेवण्यात आले आहे. धडक देऊन पसार झालेल्या अज्ञात वाहनाचा आणि चालकाचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.

---

## नौदलाचा जवान हनी ट्रॅपच्या जाळयात





**वृत्तसंस्था, कोयंबतूर**

भारतीय सैनिक पाकिस्तानच्या महिला गुप्तचरांच्या जाळ्यात अडकण्याच्या घटनात अलिकडे वाढ झाली आहे. आता भारतीय नौदलाचे नाविक प्रदीप मुखर्जी यांना पाकिस्तानी गुप्तचर एजंटना गुप्त माहिती पुरवल्याच्या आरोपात अटक करण्यात आली. आंध्रप्रदेश पोलिसांच्या काऊंटर इंटेलिजन्स सेलने ३ ऑक्टोबर रोजी कोयंबतूर स्थित आयएनएस अग्रणीवरून प्रदीप मुखर्जीला अटक केली.

आंध्र प्रदेशातील पोलिसांच्या काऊंटर इंटेलिजन्स सेलने आयएनएस अग्रणी नौदलाची लिडरशिप ट्रेनिंगशी संबंधित सुविधा आहे. प्रदीप मुखर्जी पश्चिम बंगालचे रहिवासी आहेत आणि २०१४ मध्ये भारतीय नौदलात सामिल झाले होते. ते विशाखापट्टनम् स्थित ईस्टर्न नेव्हल कमांडमध्ये तैनात होते. अटक झाली तेव्हा प्रदीप मुखर्जी कोयंबतूर येथील या सुविधात मॅनेजमेंट डेव्हलपमेंटचा कोर्स करत होते.

ते एक आठवड्यापासून तेथे उपस्थित होते. एका पाकिस्तानी गुप्तचर एजंटने काही महिन्यांआधी प्रदीप मुखर्जी यांच्याशी संपर्क केला होता. महिला एजंटने ऑनलाईन नात्याचा वापर करुन प्रदीप मुखर्जी याच्याकडून संवेदनशील माहिती मिळवली. यात महत्वाच्या संवदनशील नौदलाच्या मालमकत्ता, नौदलाच्या ताफ्याची माहिती, विशाखापट्टनम येथील नौदलाच्या अड्ड्यासंबंधित महत्वाची माहिती याचा समावेश आहे.

**डिजिटल फूटप्रिंटचा लावला छडा**

काऊंटर इंटेलिजेंस सेलने नौदल कर्मचाऱ्याच्या संबंधित संशयित डिजिटल फूटप्रिंटचा छडा लावल्यानंतर या प्रकरणाचा तपास सुरु केला. त्यानंतर प्रदीप मुखर्जी याच्यावर पाळत ठेवण्यात आली. त्यानंतर ३ ऑक्टोबर रोजी प्रदीप मुखर्जीला कोयंबतूर येथून अटक करण्यात आली.

---

### भरधाव ट्रकने तरुणाला चिरडले

**गोंदिया बालाघाट महामार्गावरील नागरा येथील घटना**

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

गोंदिया बालाघाट महामार्गावरील नागरा येथे भरधाव ट्रकने एका ३५ वर्षीय तरुणाला चिरडल्याची घटना घडली आहे. लोकेश बघेले असे मृतक तरुणाचे नाव आहे. घटनेनंतर नागरा येथील नागरिकांनी राष्ट्रीय महामार्गावर ठिय्या मांडला आहे. सध्या या महामार्गाचे बांधकाम सुरू असून बांधकाम करणाऱ्या कंपनीच्या वतीने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून व्यवस्था न केल्यामुळे यापूर्वी झालेल्या अपघातात ६ लोकांचा मृत्यू झाला आणि आज पुन्हा एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड रोष असून बांधकाम करणाऱ्या कंपनीचे अधिकाऱ्यांनी घटनास्थळी यावे अन्यथा हा आंदोलन मागे घेणार नाही अशी भूमिका नागरिकांनी घेतली आहे.

---

## राम मंदिराच्या देणगीतून भाजप-आरएसएसची कार्यालये उभारली : दिग्विजय सिंह

**वृत्तसंस्था, भोपाळ**

दिग्विजय सिंह २० ऑक्टोबरपासून महाकाल मंदिर, उज्जैन येथून अयोध्येपर्यंत सुमारे १००० किलोमीटरची 'सत्य सनातन स्वाभिमान पदयात्रा' काढणार आहेत. त्यांनी सांगितले की, ही यात्रा धर्माच्या नावाखाली पैसा कमावणाऱ्या आणि त्याचा राजकीय हत्यार म्हणून वापर करणाऱ्यांविरोधात आहे.



दिग्विजय यांनी सांगितले की, फरर आणि सावरकर यांनी हिंदुत्वाच्या नावाखाली सनातन धमार्चे विकृतीकरण केले. राम मंदिराच्या देणगीतील पैसा भाजप-आरएसएसचीची कार्यालये उभारण्यासाठी आणि निवडणुकीत वापरण्यात आला. मंदिरातील देणगीच्या रकमेत २००-३०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचाही त्यांनी दावा केला. ८० वर्षांच्या वयात एवढी मोठी यात्रा काढण्याबाबत विचारले असता दिग्विजय यांनी सांगितले की, वय हा मुद्दा नाही. इंग्रजीत एक म्हण आहे.

ए मॅन इज एज ओल्ड एज ही फील्स जर मला स्वतःला ५० वर्षांचे वाटत असेल, तर कोणालाही आक्षेप नसावा.

दिग्विजय सिंह यांनी सनातन धर्माबद्दल बोलताना महात्मा गांधींचे उदाहरण दिले. त्यांनी सांगितले की, गांधी सनातन धर्म आणि सनातनी परंपरांचा आदर करत होते. त्यांच्यासाठी रघुपती राघव राजा राम, सबको सन्मति दे भगवान, ईश्वर-अल्लाह तेरो नाम हीच सनातनची भावना होती. ते म्हणाले की, गांधींनी गरीब आणि शोषित लोकांसाठी काम केले तसेच हिंदू-मुस्लिम ऐक्याची बाजू मांडली. भारत सर्वांचा आहे आणि विविधतेतील एकताच आपली ताकद आहे.

**वेद आणि उपनिषदांमध्ये हिंदू शब्द नाही**

दिग्विजय यांनी म्हटले की, आज हिंदू धर्माऐवजी सनातन धमार्ची गोष्ट वेगळ्या पद्धतीने मांडली जात आहे. त्यांनी म्हटले की हिंदू हा शब्द फारसी आहे आणि वेद, उपनिषदे तसेच इतर प्राचीन ग्रंथांमध्ये त्याचा उल्लेख आढळत नाही. त्यांनी म्हटले की, सनातन ही जगातील सर्वात प्राचीन धार्मिक परंपरांपैकी एक आहे. तिचा संदेश वसुधैव कुटुंबकम म्हणजे संपूर्ण जग एक कुटुंब आहे, असा आहे. त्यांच्या मते, आरएसएस आणि व्हीएचपी यांनी सनातनच्या याच विचाराचे विकृतीकरण केले आहे.

संपादकीय लेखणीतून...

## शिक्षक: विद्यार्थ्यात जीवनमूल्य व कौशल्य रुजविणारे

जागतिक शिक्षक दिन दरवर्षी ५ ऑक्टोबरला साजरा केला जातो, जो शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांच्या अमूल्य योगदानाचा सन्मान करण्यासाठी आहे. युनेस्कोने १९९४ साली हा दिन स्थापन केला, जो १९६६ च्या शिक्षकांच्या स्थितीवर केलेल्या शिफारशीच्या वार्षिक स्मरणार्थ आहे. या दिवशी शिक्षकांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले जाते, कारण ते केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये जीवनातील मूल्ये आणि कौशल्ये रुजवण्यासाठी प्रयत्नशील असतात. शिक्षक हे समाजाचे आधारस्तंभ असतात, जे विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि वैयक्तिक आव्हानांचा सामना करण्यास सक्षम करतात. या दिवशी विविध देशांमध्ये शिक्षकांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले जाते, जसे की कमी संसाधने, अल्प वेतन, आणि जास्त कामाचा ताण. प्रत्येक वर्षी या दिवसाचे वेगळे विषय असतात, जसे की शिक्षकांचे सशक्तीकरण, शिक्षणातील नवकल्पना, आणि समान संधी. हा दिवस शिक्षकांना सन्मानित करण्याचा आणि समाजाच्या प्रगतीत त्यांच्या भूमिकेची जाणीव करून देण्याचा दिवस आहे. जागतिक शिक्षक दिन हा दरवर्षी ५ ऑक्टोबर रोजी जगभरात साजरा केला जातो. भविष्यातील पिढीला घडवण्यात आणि शिक्षकांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी हा दिवस पाळला जातो.

शिक्षकांच्या हक्कांचे आणि जबाबदाऱ्यांचे रक्षण करणे तसेच शिक्षण क्षेत्रात सुधारणा घडवून आणणे. युनेस्कोने सन १९९४ मध्ये ५ ऑक्टोबर हा दिवस जागतिक शिक्षक दिन म्हणून घोषित केला. ५ ऑक्टोबर १९६६ रोजी युनेस्को आणि आंतरराष्ट्रीय श्रम संघटन यांनी शिक्षकांच्या स्थितीबद्दलच्या शिफारसी मान्य केल्या होत्या. या ऐतिहासिक निर्णयाच्या स्मरणार्थ हा दिवस निवडला गेला. आज जगभरातील १०० पेक्षा जास्त देशांमध्ये हा दिवस विविध उपक्रमांनी साजरा केला जातो. भारतात दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसानिमित्त "राष्ट्रीय शिक्षक दिन" साजरा केला जातो, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर ५ ऑक्टोबर रोजी "जागतिक शिक्षक दिन" असतो.

शिक्षक दिन हा शिक्षकांच्या कौतुकाचा एक विशेष दिवस आहे आणि एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील त्यांच्या विशेष योगदानाबद्दल किंवा सामान्यतः समुदायामध्ये त्यांचा सन्मान करण्यासाठी उत्सवांचा समावेश असू शकतो. शिक्षक दिन साजरा करण्याची कल्पना १९व्या शतकात अनेक देशांमध्ये रुजली; बहुतेक प्रकरणांमध्ये, ते स्थानिक शिक्षक किंवा शिक्षणातील महत्त्वाचा टप्पा साजरा करतात. इतर अनेक आंतरराष्ट्रीय दिवसांपेक्षा भिन्न देश हा दिवस वेगवेगळ्या तारखांना साजरा करण्याचे हे प्राथमिक कारण आहे. उदाहरणार्थ, अर्जेंटिनाने १९१५ पासून ११ सप्टेंबर रोजी डॉमिंगो फॉस्टिनो सर्मिएन्टोच्या मृत्यूचे स्मरण शिक्षक दिन म्हणून केले आहे. भारतात दुसरे राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन (५ सप्टेंबर) यांचा जन्मदिवस १९६२ पासून शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. २०२२ मध्ये शिक्षक दिन "आभार दिवस" म्हणून साजरा करण्यात आला. सन १९९४ मध्ये युनेस्कोने स्थापन केलेल्या जागतिक शिक्षक दिनासोबत अनेक देश ५ ऑक्टोबर रोजी त्यांचा शिक्षक दिन साजरा करतात. अख्ख्या जगात शिक्षक दिन हा दरवर्षी ५ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. भावी पिढी समर्थ बनविण्यासाठी शिक्षकांना सक्षम बनविणे हा या दिनाचा उद्देश आहे. युनेस्कोतर्फे हा दिवस इ.स. १९९४ पासून जगभर सुमारे १०० पेक्षा जास्त देशांमध्ये पाळला जात आहे. या दिवशी इ.स. १९६७ मध्ये युनेस्को आणि आंतरराष्ट्रीय श्रम संघटन यांनी "शिक्षकांचा दर्जा" या विषयावरील शिफारशीवर सह्या केल्या होत्या.

एज्युकेशन इंटरनशनल या संघटनेतर्फे सुद्धा हा दिवस जगभर पाळण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. इ.स. २०११ साली "लैंगिक समानतेसाठी शिक्षकांची भूमिका" हा विषय या दिनाचा गाभा होता. इ.स.२०१२ या वषार्साठी "शिक्षकांसाठी योग्य भूमिका घ्या" हा विषय घेण्यात आला. जगभरातील सर्व शिक्षकांचा गौरव करण्यासाठी दरवर्षी ५ ऑक्टोबर रोजी जागतिक शिक्षक दिन साजरा केला जातो. शिक्षकांच्या दर्जासंबंधीच्या १९६६ च्या आयएलओ/युनेस्को शिफारशीच्या स्वीकृतीच्या वर्धापनदिनानिमित्त हा दिवस साजरा केला जातो. ही शिफारस शिक्षकांचे हक्क आणि जबाबदाऱ्या, तसेच त्यांच्या प्रारंभिक तयारी व पुढील शिक्षण, भरती, रोजगार आणि अध्यापन व अध्ययन परिस्थितीसाठीचे निकष निश्चित करते.उच्च शिक्षणातील अध्यापन कर्मचाऱ्यांचा समावेश करून सन १९६६ च्या शिफारशीला पूरक म्हणून सन १९९७ मध्ये उच्च-शिक्षण अध्यापन कर्मचाऱ्यांच्या दर्जासंबंधीची शिफारस स्वीकारण्यात आली. जागतिक शिक्षक दिन सन १९९४ पासून साजरा केला जात आहे. शिक्षक शिक्षण क्षेत्रात कसे परिवर्तन घडवत आहेत? याचा उत्सव साजरा करण्याचा, तसेच त्यांची प्रतिभा, व्यवसाय पूर्णपणे वापरण्यासाठी त्यांना आवश्यक असलेल्या समर्थनावर चिंतन करण्याचा आणि जागतिक स्तरावर या व्यवसायाच्या पुढील वाटचालीवर पुनर्विचार करण्याचा हा दिवस आहे. जागतिक शिक्षक दिन हा आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, युनिसेफ आणि एज्युकेशन इंटरनॅशनल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला जातो.

# जीवनात मच्छर बना, झुरळ नाही!

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

आयुष्यात झुरळ नाही तर डास (मच्छर) बना असं म्हणण्यामागे नक्कीच काहीतरी खोल किंवा मजेशीर अर्थ लपलेला दिसतोय. दोन्हींची तुलना करायची झाली तर खूप मजेशीर दृष्टिकोन समोर येतात. झुरळ ते फक्त घाणीत किंवा अंधारात लपून राहतात. माणसं दिसली की पळून जातात आणि त्यांना पाहून लोक फक्त कंटाळा किंवा तिरस्कार व्यक्त करतात.

झुरळ नेहमी अंधारात लपून राहतं. जेव्हा घरात अचानक लाईट लागते, तेव्हा ते घाबरून इकडे-तिकडे पळायला लागतं. म्हणजेच, संकटाचा सामना न करता लपून राहण्याची त्याची प्रवृत्ती असते.

डास तो आकाराने लहान असला तरी प्रचंड धाडसी असतो! तो थेट समोरच्याच्या अंगावर जाऊन बसतो, स्वतःचं काम (रक्त पिणं) करतो आणि माणसाला त्याला मारण्यासाठी टाळ्या वाजवायला भाग पाडतो. म्हणजे तो समोरच्याला त्याच्या अस्तित्वाची जाणीव करून देतो.

डास मात्र अगदी उलट असतो. तो थेट तुमच्या कानाजवळ येऊन "गूंऽऽऽ" असा आवाज करून स्वतःच्या येण्याची चेतावणी देतो. त्याला माहित असतं की समोरून जीवघेणा हात (थप्पड) येऊ शकतो, तरीही तो उघडपणे आव्हान देतो आणि स्वतःचं काम (रक्त पिण्याचं) करून निघून जातो.

म्हणूनच, "आयुष्यात झुरळासारखं संकटांना घाबरून लपून राहण्यापेक्षा, मच्छरासारखं उघडपणे आव्हान देण्याची ताकद ठेवा" असा यामागचा एक वेगळा आणि सकारात्मक दृष्टिकोन निघू शकतो! म्हणण्याचा अर्थ हाच की जीवनात काही तरी सकारात्मक कार्य करायला पाहिजे. कितीही संकटे समस्या आली तरी त्या संकटाचा सामना करण्याची जिद्द असली पाहिजे. कॅप्टन स्मित माच्छर यांनी दाखवलेले अदम्य साहस आणि शौर्य सध्या संपूर्ण जगात कौतुकाचा विषय ठरले आहे. त्यांनी गंभीर जखमी आणि रक्तबंबाळ अवस्थेत असतानाही केवळ स्वतःच्या जिवाची पर्वा न करता विमानातील १७४ प्रवाशांचे प्राण वाचवले. ३० सप्टेंबर २०२६ रोजी फ्लायदुबईचे विमान दुबईहून इस्त्रायलच्या तेल अवीवकडे जात होते. उड्डाणानंतर सुमारे अडीच तासांनी कॉकपिटमध्ये ओमानच्या कट्टरपंथीय सहवैमानिकाने (को-पायलट) विमान क्रॅश करण्याच्या हेतूने मुख्य पायलट कॅप्टन स्मित माच्छर यांच्यावर चाकूने भीषण हल्ला केला. या हल्ल्यादरम्यान आणि कॉकपिटमधील झटापटीमुळे विमान अवघ्या एका मिनिटात ३३,०००फुटांवरून थेट १७,००० फुटांवर वेगाने खाली आले.

हल्ल्यात कॅप्टन स्मित माच्छर यांच्या छातीवर, पोटावर आणि हातावर गंभीर जखमा झाल्या होत्या आणि ते कॉकपिटच्या जमिनीवर कोसळले होते. प्रचंड रक्तस्त्राव होत असतानाही त्यांनी धीर सोडला नाही. विमान वेगाने खाली कोसळत असल्याचे लक्षात येताच त्यांनी त्यांच्या शरीरातील सर्व ऊर्जा एकवटून शेवटचा प्रयत्न केला आणि कॉकपिटचा दरवाजा आतून उघडला. दरवाजा उघडल्यामुळे विमानातील केबिन क्रू आणि प्रवाशांना तातडीने आत येणे शक्य झाले आणि त्यांनी मिळून हल्लेखोर सहवैमानिकाला दोरीने बांधून नियंत्रणात आणले. त्यानंतर विमानातील राखीव वैमानिकांच्या मदतीने विमानाचे सौदी अरेबियातील तबुक विमानतळावर सुखरूप आपत्कालीन लँडिंग करण्यात आले.

थोडक्यात सांगायचे तर, समस्येच्या जाळ्यात न अडकता, एक हसरा आणि खंबीर योद्धा बनून प्रत्येक परिस्थितीचा आनंद घ्या! लोकांना त्रास देणारे किंवा त्यांच्यात नकारात्मकता पसरवणारे 'झुरळ' बनण्यापेक्षा, नेहमी हसतमुख राहून लोकांचे लक्ष वेधून घेणारे माच्छर बना.लोकांच्या नजरेतून सुटून कोपऱ्यात लपून जगण्यापेक्षा (झुरळासारखे), आपल्या कर्तृत्वाने आणि आत्मविश्वासाने स्वतःची जागा निर्माण करणे (मच्छरासारखे) कधीही चांगले!

– ९५६१५९४३०६

# "गुरू बिना ज्ञान अधुरा"; गुरू-शिष्याचे नाते अतूट असावे

रमेश लांजेवार
नागपूर

जगातील शिक्षकांसाठी ५ आक्टोंबर सन्मानजनक दिन आहे. शिक्षकांच्या प्रती सहयोग व आत्मविश्वास वाढावा आणि भविष्यातील पिढीची आवश्यकता पुर्ण व्हावी याकरिता शिक्षकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या विशिष्ट दिवसाला आगळेवेगळे महत्व आहे. जगातील शिक्षकांना योग्य मार्गदर्शन मिळावे व शिक्षणामध्ये नविनीकरण व आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशाने जागतिक पातळीवर शिक्षक दिवस साजरा करण्यात येतो. ५ आक्टोंबर १९६६ रोजी पॅरिसमध्ये अंतर सरकारी सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यात "टिचिंग इन फ्रीडम" संधीवर हस्ताक्षर करण्यात आले.यानंतर १९९४ ला युनेस्कोमध्ये एक सम्मेलन आयोजित करण्यात आले होते व यात ५ आक्टोंबर जागतिक शिक्षक दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली आणि तेव्हापासून ५ आक्टोंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय शिक्षक दिवस म्हणुन साजरा करण्यात येतो. जागतिक स्तरावर ही बाब सर्वांनाच समजायला पाहिजे की गुरू शिष्याचे काय नाते असते. शिक्षक हा असा चेहरा आहे की तो लाखो ते करोडो विद्यार्थी घडवीतात म्हणजेच जग व देश घडवितो. शिक्षणा विषयी अचूक माहीती देणे व प्रत्येक गोष्टीचे महत्व समजावून देणे संपूर्ण शिक्षकांचे प्रथम कर्तव्य असते. यामुळेच आपण घडतो नंतर देश घडते व याचा संपूर्ण प्रभाव जगावर पडतो.

शिक्षक दिनाचा महत्त्वपूर्ण उद्देश म्हणजे शिक्षकांना सन्मान मिळणे व विद्यार्थ्यांना देश घडवीण्यासाठी प्रोत्साहीत करणे. आपण जगात आधुनिकीकरण, यांत्रीकरण, औद्योगिकीकरण यांची वाटचाल जी पहात आहोत ती शिक्षकांपासुनच निर्माण झालेली उर्जाच म्हणावी लागेल. आपण पहाले की करोणा काळात ऑनलाइन शिक्षण प्रणाली सुरू होती.परंतु विद्यार्थीवर्ग ऑनलाईन शिक्षण प्रणालीला जवळ करायला तयार नव्हते. त्यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांचे नाते ऑनलाईन राहुच शकत नाही.कारण करोना काळातील दोन वर्षाच्या काळात संपूर्ण जगातील विद्यार्थी शिक्षकांपासुन व शाळा-कॉलेजपासुन दुरावले होते त्यामुळे संपूर्ण शिक्षणाचा खोळंबा झाला व आज विद्यार्थांना त्यांचे प्रायश्चित्त भोगावे लागत आहे आणि ऑफलाईन(प्रत्यक्ष) शिक्षण जड होतांना दिसत आहे.ऑफलाईन शिक्षणामुळे जेवढी ज्ञाणामध्ये भर पडते, तेवढी ऑनलाईन (अप्रत्यक्ष) शिक्षण प्रणालीत पडत नाही हे आपल्याला कोरोनाने दाखवून दिले.यामुळे प्रत्यक्षात शिक्षणाने जवळीक वाढुन ज्ञाणात मोठी भर पडते.

प्रत्येक देश आप-आपल्या पध्दतीने शिक्षक दिवस साजरा करीत असतो. यामध्ये भारतात माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्म दिवशी म्हणजे ५ सप्टेंबरला शिक्षक दिवस साजरा करण्यात येतो, चीन २७ ऑगस्ट, रूस ५ आक्टोंबर अशाप्रकारे जगातील अनेक देश आप-आपल्या पध्दतीने शिक्षक दिवस साजरा करतात.कारण यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांचे अतूट संबंध निर्माण होवून गुरू-शिष्याचे नाते निर्माण होतात. यामुळे शिक्षणाचे आगळावेगळे महत्व दिसून येते. परंतु ५ आक्टोंबर आंतरराष्ट्रीय शिक्षक दिनाचे वेगळेच महत्व आहे कारण संपूर्ण जग एकाच दिवशी शिक्षकांच्या गुणवत्तेची पावती जगाला देत असते व उत्सहाचे वातावरण निर्माण करतो. यामुळे जगातील शिक्षकांचा मानसन्मान वाढतो व गुरू-शिष्याचे घनिष्ठ संबंध निर्माण होते. जगात गुरू-शिष्याचे नाते आजचेच नसुन पुरातन काळातील आहे. ऋषी-मुनि, ज्ञाणी, देव-दानव, राजे-महाराजे, थोर पुरुष, क्रांतिकारक याची संपुर्ण वाटचाल शिक्षकांपासुनच निर्माण झाली आहे.आपण खेळांचा जरी विचार केला तर गुरू शिवाय खेळाडू सुध्दा तयार होत नाही. म्हणजेच कोणतेही शिक्षण असो या करीता शिक्षक अती आवश्यक असतोच म्हणून म्हणतात "गुरू बिना ज्ञान अधुरा" आई-वडीलांमध्ये सूध्दा आपल्याला मुलांच्या दृष्टीकोनातून गुरू-शिष्याचे अतुट नाते दिसून येते. तेव्हाच मुलं-मुली परीपक्व होतात. त्याकाळी शिक्षकांना गुरू म्हणायचे व विद्यार्थ्यांना शिष्य.आताही तेच आहे फक्त शब्द बदलून शिक्षक-विद्यार्थी असे नामकरण झाले आहे. म्हणजे पुर्वीही शिक्षकांविना ( गुरू) शिक्षण अधुरे रहायचे आणि आजही तेच आहे. त्यामुळे शिक्षक हा घटक जगासाठी व देशासाठी अत्यंत महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. कारण यातुनच विद्यांर्थांचा उगम होतो व देश घडवीण्याचा मार्ग मोकळा होतो.

शिक्षण हे विकत मिळत नसते तर ते अवगत करावे लागते. शिक्षण ही अशी संजीवनी आहे की त्याला कोणीही चोरू शकत नाही किंवा हीरावु शकत नाही. त्यामुळे शिक्षण शिकण्यासाठी कोणत्याही प्रकारची वयोमर्यादा नसते.परंतु शिक्षणाचा उज्वल मार्ग निर्माण करण्यासाठी चांगल्या शिक्षकांची आवश्यकता जरूर असते. जगात बदलते हवामान पहाता आंतराष्ट्रीय शिक्षक दिनाच्या निमित्ताने जगातील संपूर्ण शिक्षकांनी पृथ्वीवरील जीवसृष्टी वाचविण्यासाठी ५ आक्टोंबरला प्रत्येक शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा संकल्प करावा व यात संपूर्ण विद्यार्थांना (शिष्यांना) सहभागी करून भारतासह संपूर्ण जगात हिरवागार गालिचा निर्माण होईल यापध्दतीने जगातील संपूर्ण शिक्षकांनी पाऊले उचलावीत. यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल. कारण गुरू-शिष्याच्या पुढील वाटचाली करीता मन प्रसन्न असने गरजेचे आहे. कारण पुर्वी शिक्षण हे वृक्षांच्याच सानिध्यात दिले जात असे त्यामुळेच आज प्रत्येकांच्या आयुष्यासाठी गुरू-शिष्याप्रमाणेच वृक्षांशीही नाते घनिष्ठ करणे गरजेचे आहे. कारण ज्या प्रमाणे शिक्षकांविना ज्ञाण नाही त्याच प्रमाणे वृक्ष विना सृष्टी नाही म्हणजेच संपूर्ण जीवन अधुरेच. त्यामुळे प्रत्येक सणाला, महत्त्वपूर्ण दिवसाला वृक्षारोपण व्हायलाच पाहिजे. ५ आक्टोंबरला जागतिक शिक्षक दिवसाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी.

– ९९२१६९०७७९

# एक श्राद्ध : स्मरणातून कृतज्ञतेकडे

माणूस कितीही आधुनिक झाला, काळ कितीही बदलला, तरी त्याच्या आयुष्याची मुळे आपल्या पूर्वजांच्या त्यागात, संस्कारात आणि आठवणींत घट्ट रुजलेली असतात . पूर्वजांचे स्मरण करण्याची, त्यांच्या ऋणाची जाणीव ठेवण्याची आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची एक भावपूर्ण परंपरा म्हणजे श्राद्ध.

'श्राद्ध' हा शब्दच 'श्रद्धा' या भावनेशी जोडलेला आहे. श्रद्धेने केलेले स्मरण म्हणजे श्राद्ध. आपल्या घरातील आई-वडील, आजी-आजोबा किंवा इतर दिवंगत आप्तस्वकीय आज आपल्यासोबत नसले, तरी त्यांच्या आठवणी आपल्या मनात सदैव जिवंत असतात. त्यांनी दिलेले संस्कार, शिकवलेले धडे, सांगितलेल्या गोष्टी आणि केलेले कष्ट आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग असतात.

पितृपक्ष आला की अनेक घरांमध्ये पूर्वजांचे श्राद्ध केले जाते. तर्पण, पिंडदान, अन्नदान यांसारख्या परंपरा श्रद्धेने पाळल्या जातात. या विधींच्या मागे धार्मिक श्रद्धा तर आहेच; पण त्यामागचा कृतज्ञतेचा भाव अधिक महत्त्वाचा आहे. ज्यांच्यामुळे आपण आज आहोत, त्यांना विसरू नये, ही जाणीव या परंपरेतून व्यक्त केली जाते. आजचे जीवन अतिशय धावपळीचे आहे, पुढच्या पिढीला आपल्या पूर्वजांविषयी फारशी माहितीही नसते. अशा वेळी श्राद्ध ही केवळ एक धार्मिक परंपरा किंवा जबाबदारी न राहता, आपल्या पुढच्या पिढीला आपल्या कुटुंबाचा इतिहास, संस्कार आणि परंपरा सांगण्याची एक सुंदर संधी ठरू शकते. पूर्वजांचे खरे श्राद्ध केवळ त्यांच्या नावाने विधी करण्यात आहे का? की त्यांनी दिलेल्या संस्कारांनुसार जगण्यात आहे? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा.

पूर्वजांच्या स्मरणार्थ अन्नदान करणे, गरजूंना मदत करणे, वृक्षारोपण करणे, एखाद्या विद्यार्थ्याच्या शिक्षणाला हातभार लावणे किंवा समाजासाठी एखादे चांगले कार्य करणे—अशा कृतींमधूनही त्यांच्या स्मृतींना अर्थपूर्ण आदरांजली वाहता येते. शरीर निघून जाते; पण माणसाने दिलेले प्रेम, संस्कार आणि विचार मागे राहतात. म्हणूनच श्राद्धाच्या निमित्ताने केवळ पूर्वजांचे स्मरण नको, तर त्यांच्या चांगल्या विचारांचेही स्मरण करूया. त्यांच्या आठवणींना केवळ अश्रूंमध्ये अडकवून न ठेवता, त्या आपल्या कृतीत उतरवूया. कारण पूर्वजांना खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांच्या स्मृती जपणे आणि त्यांच्या संस्कारांचा दिवा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे. श्रद्धेने केलेले स्मरण म्हणजे श्राद्ध; आणि कृतज्ञतेने जगलेले जीवन म्हणजे पूर्वजांना खरी आदरांजली.

**– प्रतिभा पिटके, अमरावती**



# ३५० धावांचा डोंगर उभारूनही भारताचा पराभव; वेस्ट इंडिजचा ऐतिहासिक विजय, रोहित शर्माचा नवा विश्वविक्रम

डॉ. दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

धावफलकावर तब्बल ३५१ धावांचा विशाल डोंगर उभा करूनही भारतीय संघाला वेस्ट इंडिजविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात ५ गडी राखून अनपेक्षित पराभवाला सामोरे जावे लागले. न्यू चंदीगड येथील मैदानावर रंगलेल्या या अत्यंत रोमांचक लढतीत वेस्ट इंडिजने ४८.२ षटकांत ३५२ धावांचे लक्ष्य गाठत एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासातील आपला सर्वात मोठा यशस्वी पाठलाग नोंदवला.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये ३५० किंवा त्याहून अधिक धावांची मजल मारूनही भारताने सामना गमावण्याची ही इतिहासातील तिसरीच वेळ ठरली. यापूर्वी २०१९ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध आणि २०२५ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारतावर अशी वेळ ओढवली होती. याच मालिकेतील दुसऱ्या सामन्यात विंडीजच्या ४०५ धावांचे लक्ष भारताने लिलया पार केले होते. त्याचा न कळत बदलाही विंडीजने लगोलग घेतला.

नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ७ गडी गमावून ३५१ धावा उभारल्या. यात सलामीवीर रोहित शर्माने ऐतिहासिक टप्पा गाठताना सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडीत काढला. रोहित आता एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद १० हजार धावा पूर्ण करणारा सलामीवीर ठरला आहे. त्याने अवघ्या २०२ डावांमध्ये ही कामगिरी केली, तर सचिनने यासाठी २१४ डाव घेतले होते. सलामीवीर म्हणून हा पराक्रम करणारा रोहित हा सचिन तेंडुलकर, सनथ जयसूर्या आणि ख्रिस गेल यांच्यानंतर जगातील चौथा फलंदाज बनला. सामन्यादरम्यान रोहितने ऋतुराज गायकवाडसोबत तिसऱ्या गड्यासाठी १३७ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. रोहितच्या कारकिर्दीतील ही ७५ वी शतकीय भागीदारी ठरली असून सर्वाधिक शतकीय भागीदाऱ्यांच्या यादीत तो तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे.

पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या के. एल. राहुलने संयमी आणि आक्रमक खेळी करत नाबाद १२९ धावांची तडाखेबंद खेळी केली. पाचव्या क्रमांकावर भारताकडून खेळली गेलेली ही तिसरी सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या ठरली. मात्र, दिग्गज फलंदाज विराट कोहलीला पहिल्याच चेंडूवर बाद करून वेस्ट इंडिजच्या जेडन सील्सने धक्का दिला. कोहलीला एकदिवसीय सामन्यात पहिल्याच चेंडूवर बाद करणारा सील्स हा जगातील चौथा गोलंदाज ठरला; विशेष म्हणजे या चारपैकी तीन गोलंदाज वेस्ट इंडिजचेच आहेत.

या सामन्यात भारतीय संघाने एकदिवसीय क्रिकेटमध्ये तब्बल ४५ व्यांदा ३५० हून अधिक धावांचा पल्ला गाठण्याचा विक्रम केला. दक्षिण आफ्रिका ३६ वेळा अशी कामगिरी करून या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. या संपूर्ण मालिकेत भारतीय संघाने प्रतिषटक ७.४३ च्या विक्रमी धावगतीने फलंदाजी केली. तीन किंवा त्यापेक्षा जास्त सामन्यांच्या द्विपक्षीय मालिकेत नोंदवला गेलेला हा सर्वोच्च धावगतीचा दर आहे. याशिवाय भारताने तीन सामन्यांत विक्रमी ४५ षटकार खेचले, जे कोणत्याही तीन सामन्यांच्या द्विपक्षीय मालिकेत एका संघाने ठोकलेले सर्वाधिक षटकार आहेत.

विजयासाठी ३५२ धावांचे अशक्यप्राय वाटणारे आव्हान समोर असताना विंडीजचा कर्णधार आणि यष्टीरक्षक शाई होपने अविश्वसनीय खेळी साकारली. होपने नाबाद १६२ धावांची वादळी खेळी करून भारताच्या तोंडचा घास पळवला. भारताविरुद्ध एकदिवसीय क्रिकेटमध्ये लक्ष्याचा पाठलाग करताना कोणत्याही परदेशी फलंदाजाने केलेली ही सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या ठरली असून त्याने तिलकरत्ने दिलशानचा विक्रम मागे टाकला. या शानदार शतकासह होपने कर्णधार व यष्टीरक्षक म्हणून सर्वाधिक ८ शतके झळकावण्याचा आपलाच विक्रम अधिक मजबूत केला. या यादीत भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी ६ शतकांसह दुसऱ्या स्थानावर आहे. तसेच भारतात भारताविरुद्ध चौथे शतक झळकावत त्याने डॅरिल मिचेलच्या विक्रमाशी बरोबरी साधली. त्याला अमीर जंगूने उत्कृष्ट साथ दिली; जंगूने या मालिकेतील तिन्ही सामन्यांत पन्नासहून अधिक धावा करण्याचा पराक्रम केला.

दुसरीकडे भारतीय गोलंदाजांसाठी हा सामना अत्यंत निराशाजनक ठरला. भारतीय गोलंदाज गुरनूर बरारने मालिकेतील तीन सामन्यांत मिळून तब्बल २५३ धावा दिल्या. सलग तीन एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा लुटवणारा गोलंदाज म्हणून त्याच्या नावे एका नकोशा विक्रमाची नोंद झाली. धावांमागून धावा निघणाऱ्या या अटीतटीच्या सामन्यात अखेर विंडीजच्या फलंदाजांनी संयम आणि आक्रमकतेचा समतोल राखत ४९ व्या षटकात ऐतिहासिक विजयावर शिक्कामोर्तब केले.

– ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# महागाईचा दबाव, आरबीआय रेपो रेट वाढविणार ?

## वाढ झाल्यास गृह, वाहन आणि वैयक्तिक कर्जाच्या हप्त्यांवर परिणाम

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**




पश्चिम आशियातील संघर्षामुळे केवळ तेल संकटच नव्हे तर भारतासह जगाला महागाई वाढण्याची भीतीही आहे. यामुळे आरबीआयवर व्याजदर वाढविण्याचा दबाव वाढला आहे. अमेरिकी डॉलरसमोर रुपयाचे सतत अवमूल्यन आणि परकीय गुंतवणुकदारांची विक्री हे मोठे आव्हान असून आता आरबीआय ऑक्टोबरच्या बैठकीत रेपो दर वाढवून महागाईला आळा घालण्याचा प्रयत्न करेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महागाईत मोठी वाढ होण्याची भीती आणि जगातील प्रमुख मध्यवर्ती बँकांच्या भूमिकेतील बदलाच्या पार्श्वभूमीवर भारतीय रिझर्व्ह बँकेवरील व्याजदर वाढविण्याचा दबाव वाढला आहे. आरबीआयची ६ सदस्यीय मौद्रिक धोरण समितीची ५ ते ७ ऑक्टोबरदरम्यान बैठक होणार आहे. यामध्ये व्याज दर वाढवायचा की नाही, याबाबत स्पष्ट निर्णय घेईल. सध्या रेपो दर ५.२५ टक्के असून यामध्ये वाढ झाल्यास गृह, वाहन आणि वैयक्तिक कर्जाच्या हप्त्यांवर परिणाम होऊ शकतो. तसेच मुदत ठेवींवर आकर्षक व्याजदर मिळू शकतात.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आता ऑक्टोबरमध्ये महागाईचा आणखी एक धमाका करू शकते. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे भारताच्या आयात खर्चात वाढ होऊ शकते. त्यामुळे महागाईवर थेट परिणाम होईल. याशिवाय अमेरिकन बाँडवरील वाढत्या परताव्यामुळे जागतिक स्तरावर व्याजदर आणि गुंतवणुकीवर दबाव येऊ शकतो.

अशा परिस्थितीत जपानी ब्रोकरेज फर्म-नोमुराच्या अंदाजानुसार आरबीआय ऑक्टोबर आणि डिसेंबरमध्ये प्रत्येकी २५ बेसिस पॉईंटने रेपो दरात वाढ करून ५.७५ टक्क्यांपर्यंत नेऊ शकते. पण वाढलेल्या किमतींमुळे मागणीवर परिणाम होऊ शकतो आणि महागाईचा दबाव हळूहळू कमी झाल्यावर फेब्रुवारी २०२७ नंतर दरवाढीचा वेग मंदावू शकतो.

### महागाई वाढण्याची भीती

ऑगस्टमध्ये किरकोळ महागाई ४.८२ टक्क्यांवर पोहोचली असून सलग तिसऱ्या महिन्यात आरबीआयच्या ४ टक्के उद्दिष्टापेक्षा जास्त राहिली. तसेच ऑगस्टमध्ये घाऊक महागाईदेखील ९.९२ टक्क्यांवर पोहोचली. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बँक आणि जपानच्या मध्यवर्ती बँकेने अलीकडेच २५ बेस पॉइंटनी व्याजदर वाढविला. आरबीआयही तसे पाऊल उचलू शकते.

### कर्जाच्या खर्चात वाढ होऊ शकते

मुळात रिझर्व्ह बँकेने व्याजदर वाढविणे शेअर मार्केटसाठी चांगले संकेत नाहीत. यामुळे कजार्चे दर वाढतील आणि कर्जाच्या खर्चात वाढ झाल्याने कंपन्यांच्या नफ्यात घट होऊ शकते. तसेच व्याजाशी संबंधित क्षेत्रांत मागणी मंदावण्याची शक्यता आहे. याचा परिणाम शेअर्सवर होऊ शकतो.

---

थोडक्यात

## तालुकास्तरीय खो-खो क्रीडा स्पर्धेचे आयोजन

### सतरा वर्षीय वयोगटात जनता विद्यालय मुलींच्या संघ विजयी

**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नागपूर अंतर्गत तालुका क्रीडा समिती मौदा द्वारे तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेचे आयोजन जनता



विद्यालय मौदा येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत १४ वर्ष १७ वर्ष १९ वर्ष. मुले, मुलींचे सामने पार पडले १४ वर्ष मुलींच्या गटात भवन्स विद्या मंदिर एनटीपीसी मौदा विजयी ठरले. सतरा वर्ष मुलींच्या गटात जनता विद्यालय मौदा विजयी ठरले. १४ वर्षे मुलांच्या गटात ग्रामीण विकास विद्यालय सालवा १७ वर्ष मुलांच्या गटात ग्रामीण विकास विद्यालय सालवा विजयी ठरले. जनता विद्यालयाच्या विजयी मुलींच्या संघात अक्षरा ज्ञानेश्वर मारबते, सृष्टी दादाराव गौरखेडे,रिधिमा सुरेश मानकर,राधिका गजेंद्र गोंडाणे, यशस्वी नरेंद्र बागडे, मानवी नथ्थूजी काटकर, मानवी हेमराज सोनवाने, नंदनी भोजराज नागपुरे, आरोही राजेश चरडे, आरुषी हंसराज शेंडे,अक्षरा बालचंद भोयर, प्राजक्ता आनंदपाल बांते यांचा समावेश होता.

शाळेचे मुख्याध्यापक मेश्राम सर, उपमुख्याध्यापक तांबडे सर, उपप्राचार्य बाभरे सर, पर्यवेक्षक मस्के सर, नासरे सर, मौदा तालुका क्रीडा संयोजक कनेर मॅडम, क्रीडा शिक्षक ढगे सर व शाळेतील सर्व शिक्षक बंधू भगिनींनी विजयी चमूचे अभिनंदन केले व जिल्हास्तरीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

## महात्मा ज्योतिबा फुले ब. उ. विकास मंडळ तुमसरच्या सदस्यीय कार्यकारणीची निवडणूक संपन्न

### अध्यक्षपदी राधेश्याम आमकर व सचिवपदी जोशी नेरकर यांची निवड




**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**

तुमसर तालुक्यातील महात्मा ज्योतिबा फुले बहु. विकास मंडळ हे भंडारा जिल्ह्यातील कृतिशील मंडळ असून दरवर्षी या मंडळाकडून गुणवंत विद्यार्थी, नवनियुक्त व सेवानिवृत्त कर्मचारी सत्कार ,माळी समाजातील अधिकारी व पदाधिकारी सत्कार व वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले जाते. या मंडळाच्या कार्यकारणीतील १३ सदस्यांची निवड प्रक्रिया आज दिनांक ०४ ऑक्टोबर २०२६ रविवारला मंडळाचे पूर्व अध्यक्ष ताराचंदजी कटनकार यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडण्यात आली. सन २००७ पासून प्रत्येक वर्षी सामूहिक विवाह सोहळा आयोजित केला जातो. आतापर्यंत या मंडळाकडून शेकडो गरीब व गरजू लोकांच्या मुला-मुलीचे सामूहिक विवाह करून देऊन त्यांचा संसार सुखाचा केलेला आहे. विवाह सोहळ्यात विवाह करणाऱ्या जोडप्यांना संसारोपयोगी विविध प्रकारचे वस्तू व साहित्य मंडळाकडून भेट दिल्या जाते. याशिवाय अनेक सामाजिक व सेवाभावी कार्य मंडळातर्फे व माळी समाज बांधवाकडून लोक वर्गणी गोळा करून केली जातात.

महात्मा ज्योतिबा फुले बहुउद्देशीय विकास मंडळ तुमसर च्या कार्यकारणीत राधेश्याम झिंगर आमकर यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून जोशी नत्थु नेरकर सचिव, कुसुम नामदेव कांबळे उपाध्यक्ष, विनोद रामचंद्र कांबळे सहसचिव, शंकर नारायण गिरडकर कोषाध्यक्ष, बंडू नत्थू बनकर सदस्य, शंकर लोंढु राऊत सदस्य, ताराचंद आडकु कटनकार सदस्य, सेवकराम मंगरू किरणापुरे सदस्य, यादोराव लाला बोरकर सदस्य, चैतराम जयराम बनकर सदस्य, रामप्रसाद महादेव नेरकर सदस्य, देवराम तातोबा राऊत यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. यावेळी मंडळाच्या सर्व नवनियुक्त कार्यकारणीची उपस्थित समाज बांधवाकडून अभिनंदन करण्यात आले.

## भाजप-महायुतीचे उमेदवार सुधाकर कोहळे आज करणार उमेदवारी अर्ज दाखल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



नागपूर पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ साठी भारतीय जनता पार्टी-महायुतीचे अधिकृत उमेदवार सुधाकर लीला विठ्ठलराव कोहळे यांचा उमेदवारी अर्ज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत दाखल करण्यात येणार आहे. यानिमित्ताने सोमवार, ५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय जनता पार्टीचे व महायुतीचे सुधीर मुनगंटीवार, डॉ. पंकज भोयर,डॉ. आशिष जैस्वाल, कृपाल तुमाने, सुलेखाताई कुंभारे, जोगेंद्र कवाडे, मायाताई इवनाते, हंसराज अहिर, अजय संचेती, विकास महात्मे, रामदास तडस, अशोक नेते, सुनील मेंढे, मधुकर कुकडे, सुरेश वाघमारे व सर्व आमदार, खासदार, नगरसेवक तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

---

## राष्ट्रसाधनेचा काव्यमय जागर

### संघ साहित्य राष्ट्रीय परिषदेत रंगले कविसंमेलन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीच्या वतीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त संघ साहित्य-समग्र चिंतन प्रवाह, काव्य धारा-राष्ट्र साधना के सौ वर्ष या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन शनिवारी वनामती सभागृह, व्ही.आय.पी. रोड, धरमपेठ येथे करण्यात आले. या परिषदेच्या सायंकाळच्या सत्रात आयोजित कविसंमेलनात देशभक्ती, राष्ट्रभावना, संस्कृती आणि मातृभूमीच्या गौरवाचा जागर करणाऱ्या विविध भाषांतील कवितांनी वातावरण भारावून गेले. यावेळी राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, स्वागत समितीचे अध्यक्ष जयंत खळतकर, सचिव डॉ. मुरलीधर चांदेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली.

डॉ. पंकज भोयर म्हणाले, विदर्भ ही महाकवी कालिदासांच्या मेघदूत या महाकाव्याची तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगेबाबा यांसारख्या महान संतांची पावन भूमी आहे. विदभार्चा साहित्यिक वारसा समृद्ध असून केंद्र व राज्य शासन कलावंत आणि साहित्यिकांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. वृद्ध कलावंत मानधन योजना, राष्ट्रीय पुरस्कार तसेच विविध सोयी-सुविधांच्या माध्यमातून कलावंत व साहित्यिकांचा गौरव केला जात असल्याची माहिती त्यांनी दिली. कविसंमेलनात आंतरराष्ट्रीय कवी गजेंद्र सोलंकी यांनी उठ जाग भारत जाग रे, हे गीत सादर केले. भारतभूमीवर जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीमध्ये राष्ट्रभावनेची जागृती निर्माण व्हावी, हा या गीतामागील विचार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रो. चारू कालरा यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रियांच्या व्यथा मांडणारी क्या उनके दिमाक में रहा होगा ही कविता सादर केली. तसेच जब ठान लिया एक नारी ने हे गीतही त्यांनी सादर केले. अनंत सप्रे यांनी माँ भारतीवर आधारित आजादी का जश्न मनाते हैं, हे गीत सादर केले. शैलेश चौथाईवाले यांनी शतकाच्या या उंबरठ्यावर आणि मातृभूमीच्या सेवेसाठी या कवितांमधून संघाच्या प्रचारकांचे कार्य व राष्ट्रसेवेची भावना मांडली. रामकृष्ण सहस्त्रबुद्धे यांनी मैं किसी का अनुसरण करता नहीं हूँ, ही कविता सादर केली.

पंकज पांडे यांनी ना पद की चाहत होती है आणि महाराष्ट्र की पावन माटी या कविता सादर केल्या. नागपूरचे राष्ट्रीय कवी दयाशंकर तिवारी मौन यांनी है प्यार भरी अपनी माटी या कवितेतून आपली माती, संस्कृती आणि शौर्यगाथेचा गौरव केला. विनीत चौहान यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमावर आधारित ये धरती छत्रपती शिवाजी महाराज की है ही कविता सादर केली. कविसंमेलनात डॉ. कीर्ती काळे, अखिल भारतीय काव्य साधना संयोजक डॉ. प्रवीण आर्य तसेच मुंबई (कल्याण) येथील कवी प्रवीण देशमुख यांनीही सहभाग घेतला.

## डॉ. कुंदा शहाणे यांच्या 'गर्भधारणेतील तणाव व्यवस्थापन' या पुस्तकाचे नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रकाशन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** मेफ्लॉवर फिटल मेडिसिन सेंटर, नागपूरच्या फिटल मेडिसिन सल्लागार डॉ. कुंदा शहाणे लिखित 'गर्भधारणेतील तणाव व्यवस्थापन' या पुस्तकाचे प्रकाशन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. यावेळी सीए



मिलिंद कानडे आणि प्लास्टिक व कॉस्मेटिक सर्जन डॉ. पवन शहाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. गर्भधारणेच्या काळात आईच्या मानसिक, भावनिक आणि शारीरिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी हे पुस्तक संपूर्ण मार्गदर्शक ठरेल. पुस्तकाची माहिती आणि मांडणी अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगत नितीन गडकरी यांनी डॉ. कुंदा शहाणे यांच्या लेखनाचे कौतुक केले.

फिटल मेडिसिन क्षेत्रातील वीस वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या डॉ. कुंदा शहाणे यांनी गर्भधारणेदरम्यान महिलांच्या मनात निर्माण होणारी अनामिक भीती, अस्वस्थता, मानसिक ताण, भावनिक चढ-उतार तसेच बाळाच्या आणि भविष्यातील आरोग्याविषयीच्या चिंता यावर सोप्या भाषेत मार्गदर्शन केले आहे. गर्भवती महिला आणि त्यांच्या कुटुंबीयांसह पती, वैद्यकीय विद्यार्थी, समुपदेशक तसेच आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिकांसाठीही हे पुस्तक उपयुक्त आहे, असे डॉ. कुंदा शहाणे म्हणाल्या.

## स्वरधारा परिवारा'ची सुरेल स्वरसंध्या: ५० च्या दशकातील अजरामर गीतांनी सजली 'द गोल्डन हिट्स'ची महफील

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**




स्वर, शब्द आणि सांगीतिक सौंदर्याचा त्रिवेणी संगम घडवत 'स्वरधारा परिवार'तर्फे गांधी जयंतीच्या निमित्ताने हिंदी मोर भवनाच्या 'अर्पण' सभागृहात एका अविस्मरणीय स्वरमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. १९५० च्या दशकातील अत्यंत लोकप्रिय, नजाकतदार आणि अजरामर गीतांवर आधारित "द गोल्डन हिट्स" या विशेष संगीत मैफिलीने हिंदी चित्रपटसंगीताचा सुवर्णकाळ जिवंत केला आणि रसिक श्रोत्यांना संगीताच्या अथांग डोहात मंत्रमुग्ध करून सोडले. या सुरेल सोहळ्याची नयनरम्य संकल्पना आणि संयोजन ज्येष्ठ संगीतसाधक चंद्रशेखर तासगावकर यांचे होते. त्यांनी आपल्या घनगंभीर व भावस्पर्शी स्वरात 'तू गंगा की मौज मैं जमना की धारा' ही स्वर्गीय तान छेडताच अवघे सभागृह तल्लीन झाले; तर दुसरीकडे 'सर जो तेरा चकराये' या गाण्यातील खोडकर अदाकारीने उपस्थितांना डोलायला भाग पाडले.

त्यानंतर मनश्री जोशी यांच्या समवेत सादर केलेल्या 'मांग के साथ तुम्हारा मैंने मांग लिया संसार' या भावमधुर युगलगीताने मैफिलीत स्वर्गीय रंग भरले, ज्यास रसिकांनी भरभरून दाद दिली. सुरांची नजाकत उधळणारा गायकवृंदः

शहरातील लब्धप्रतिष्ठित गायकांनी ५० च्या दशकातील या अमूल्य स्वररत्नांना मंचावर अप्रतिम रीतीने पैलू पाडलेः श्रीकांत पैठणकर यांनी 'किसी की मुस्कुराहटों पे हो निसार' सादर करून मानवी भावभावनांचा अत्यंत हळुवार पदर उलगडला.

भालचंद्र साठे यांनी 'माना जनाब ने पुकारा नहीं' या नखरेल गीताने मैफिलीत दिलखेचक रंगत आणली. प्रकाश पांडे यांच्या 'चल उड़ जा रे पंछी' या गाण्याने अंतर्मुख करणारी विराणी व दार्शनिक खोली निर्माण केली. मनोज गोखले यांनी 'इना मीना डिका'च्या अप्रतिम लयीने संपूर्ण सभागृहात तरुणाईचा जल्लोष निर्माण केला. रोहिणी पाटणकर यांच्या मखमली आणि सोज्वळ स्वरातील 'मोहे भूल गये सांवरिया' ऐकून रसिक श्रोते भावविभोर झाले. मानसी बढे यांनी 'ओ चांद जहाँ वो जाये' हे गीत सादर करत चांदण्यासारखी अल्हाददायक शीतलता दरवळवली. मनश्री जोशी यांनी शास्त्रीय अंग असलेल्या 'रसिक बलमा' या दर्दभऱ्या गीताची केलेली पेशकश काळजाचा ठाव घेणारी ठरली. वंदना कडू यांनी 'तुम ना जाने किस जहाँ में खो गये' गाऊन विरहाची सुरेख, व्याकूळ भावना जागी केली. शालिनी शुक्ला यांनी 'मेरा दिल ये पुकारे आजा' सादर करून श्रोत्यांवर संमोहन टाकले. देविका गोखले यांनी 'मेरा नाम चिन चिन चू' या थिरकणाऱ्या गाण्याने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे लालित्यपूर्ण, प्रवाही व बहुरंगी संचालन अशोक गांधी यांनी आपल्या सहज शेरो- शायरी आणि खुमासदार निवेदना द्वारे साधत मैफिलीची रंगत उत्तरोत्तर वाढवली.

संपूर्ण कार्यक्रमात स्वर आणि तालाचा सुवर्णमध्य साधत ध्वनी आणि तांत्रिक बाजूचे समर्थ दायित्व संजय कुलकर्णी यांनी अत्यंत कौशल्याने सांभाळले. कार्यक्रमाची सांगता चंद्रशेखर तासगावकर आणि मानसी बढे यांच्या 'जाने कहाँ मेरा जिगर गया जी' या उडत्या चालीच्या अवीट युगलगीताने झाली. सात दशके उलटूनही या गीतांचा टवटवीतपणा आणि गोडवा आजही तितकाच ताजा असल्याची साक्ष या संध्येने दिली. उपस्थित सर्व संगीतप्रेमींनी या देखण्या मैफिलीचे मनःपूर्वक कौतुक केले.

## ४५ पक्षी प्रजातींच्या नोंदीने कोठारीत रंगला बर्ड वॉक

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे**




वन्यजीव सप्ताहानिमित्त कोठारी वनपरिक्षेत्रातील करंजी परिसरात निसर्गाच्या सान्निध्यात बर्ड वॉक अर्थात पक्षी निरीक्षण उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात विविध ४५ पक्षी प्रजातींची नोंद करण्यात आल्याने परिसरातील समृद्ध जैवविविधता अधोरेखित झाली.

कोठारी वनपरिक्षेत्र कार्यालय अंतर्गत आयोजित या उपक्रमात वनकर्मचारी आणि निसर्गप्रेमींनी सकाळच्या शांत वातावरणात जंगल परिसराची पायवाट धरत पक्ष्यांचे निरीक्षण केले. पक्ष्यांचे आवाज, हालचाली, अधिवास आणि त्यांच्या नैसर्गिक वर्तनाचा प्रत्यक्ष अनुभव सहभागींकडून घेण्यात आला.

कोठारीचे वनपरिक्षेत्र अधिकारी तथा वन्यजीव अभ्यासक रुंदन कातकर आणि मानद वन्यजीव रक्षक मुकेश भांदककर यांनी सहभागींना विविध पक्ष्यांची ओळख करून देत त्यांच्या अधिवास, आहार, प्रजनन, वर्तन आणि परिसंस्थेतील महत्त्वाची भूमिका याबाबत माहिती दिली.

पक्ष्यांची उपस्थिती ही परिसरातील पर्यावरणीय आरोग्याचा महत्त्वाचा संकेत मानली जाते. त्यामुळे पक्ष्यांचे संरक्षण करताना त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे जतन करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या पक्षी निरीक्षणादरम्यान आढळलेल्या ४५ प्रजातींची नोंद eBird या जागतिक ऑनलाइन व्यासपीठावर करण्यात आली. सुगरण, धीवरपक्षी, पाणकावळा, सर्पपक्षी, होले, टिटवी, तिरचिमणी, पोपट, शिंपी, वटवटे, शिक्रा, सातभाई, चंडोल, वेडाराघू, कोतवाल, भारिट, सुतार, बगळे आणि ढोकरी यांसह अनेक पक्ष्यांचे दर्शन झाले.

पक्ष्यांची केवळ नावे जाणून घेण्यापेक्षा त्यांचा आवाज, उडण्याची पद्धत, हालचाली आणि अधिवास यावरून त्यांची ओळख कशी करावी, याचे प्रात्यक्षिकही यावेळी देण्यात आले. त्यामुळे वनकर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष जंगलात पक्षी निरीक्षणाची शास्त्रीय पद्धत समजून घेण्याची संधी मिळाली. निरीक्षणातून ज्ञान आणि ज्ञानातून संवर्धन या उद्देशाने झालेल्या या उपक्रमातून स्थानिक जैवविविधतेकडे पाहण्याची नवी दृष्टी वनकर्मचाऱ्यांना मिळाली. वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने पक्षी आणि त्यांच्या अधिवासाच्या संरक्षणाचा संदेशही या माध्यमातून देण्यात आला.

या वेळी वनपाल गेडाम, पिल्लारे, ढुमणे, गेडाम तसेच वनरक्षक रामगिरकर, बोरे, शेख, कावळे, बोडे, साखरकर, घोळवे, प्रतापगीरवार आणि वनमजूर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी करंजीचे वनपाल पिल्लारे यांनी विशेष सहकार्य केले.

थोडक्यात

## आज रामटेक नगर परिषद प्रशासनाचे विरोधात अंबाला येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे भीक मांगो आंदोलन



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान स्व लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित रामटेक नगर परिषदचे भ्रष्टाचारी कारभारा विरोधात व अंबाला येथील अवैध पार्किंग वसुली, अस्वच्छ शौचालय, पिण्याचा शुद्ध पाण्याची नसलेली पुरेशी सुविधा, अंबाला तलावात नाल्या, नाले यातून वाहणारे घाण पाणी जात आहे आणि अत्यंविधी, दशक्रिया व आंघोळ या साठी येणारे लोक या घाण, दूषित पाण्यात आंघोळ करत आहेत, डुबकी मारत आहेत, अनेक लोक अस्थी विसर्जन करत आहेत, वाहन लावण्यासाठी कुठलेही पार्किंग स्टँड नाही लोक रस्त्यावर वाहने उभी करत आहेत. मात्र पार्किंग स्टँड चे नावाने नगर परिषद लाखो रुपये तीर्थकरु, भाविक, पर्यटक यांच्याकडून वसुली करून लोकांना त्रास देत आहेत. दरवर्षी अंबाला विकासाच्या नावाखाली लाखो रुपये खर्च केले जात असल्याचे सांगितले जाते. मात्र काम एकही दिसत नाही सर्व पैसा भ्रष्टाचारातून घश्यात घातला जात आहे.

अंबाला येथील अवस्थ्येविरोधात येथे येणारे भाविक, नागरिक येथील रहिवासी, दुकानदार यांच्या मनात भ्रष्टाचारी, कमिशन खोर, वसुली बाज नगर परिषद प्रशासनाचे विरोधात व स्थानिक सत्ताधारी लोकप्रतिनिधी यांच्या सह प्रचंड रोष व्यक्त होत आहे. आज भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष व नगरसेवक रमेश कारामोरे, गटनेते अभिषेक डहारे नगरसेवक माणिक ताकोत, शालिनीताई महाजन, शीतल गजभिये, माजी नगरसेवक उमेश महाजन, ताराचंद जी धंद्रे,करीम मालाधारी, संजय बागडे, अतुल गजभिये, अविनाश कोल्हे, विमलताई नागपुरे, मीनाताई इंदूरकर यांच्या उपस्थितीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचेवतीने भीक मांगो आंदोलन करण्यात आले.

## रामटेक विधानसभा क्षेत्रस्तरीय गणेश मंडळ सजावट स्पर्धेचा निकाल जाहीर

### श्री रामाळेश्वर नवयुवक गणेश मंडळ प्रथम, बुद्धी विधाता गणेश मंडळ द्वितीय



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

भारतीय जनता पार्टी रामटेक विधानसभा क्षेत्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विधानसभा क्षेत्रस्तरीय गणेश मंडळ सजावट स्पर्धा २०२५ चा निकाल जाहीर करण्यात आला. गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे जतन करण्यासोबतच आकर्षक सजावट, सामाजिक संदेश, स्वच्छता आणि पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत रामटेक विधानसभा क्षेत्रातील विविध गणेश मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मंडळांच्या सजावटीचे विविध निकषांच्या आधारे परीक्षण करण्यात आले. स्पधेर्तील विजेत्या मंडळांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार असून, यासाठी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेतील विजेते मंडळे - प्रथम क्रमांक- ५१,०००- श्री रामाळेश्वर नवयुवक गणेश मंडळ, रामाळेश्वर वार्ड, रामटेक द्वितीय क्रमांक -३१,०००, बुद्धी विधाता गणेश उत्सव मंडळ, मंगळवारी वार्ड, रामटेक, तृतीय क्रमांक -२१,००० टेकाडी का राजा श्री गणेश नवयुवक मंडळ, टेकाडी, चतुर्थ क्रमांक - ११,०००, बाल गणेश उत्सव मंडळ, निमखेडा, पंचम क्रमांक - ५,०००,शिव नगर गणेश उत्सव मंडळ, पवनी, देवलापार यांचा समावेश आहे.

गणेश मंडळांनी उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, संस्कृती आणि भक्तीची भावना वृद्धिंगत करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे यावेळी कौतुक करण्यात आले. सर्व विजेत्या मंडळांचे भारतीय जनता पार्टी रामटेक विधानसभा क्षेत्राच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले. यावेळी डी. मल्लिकार्जुन रेड्डी, माजी आमदार, रामटेक विधानसभा क्षेत्र यांनी गणेश मंडळांच्या सहभागाचे कौतुक केले. अशा सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांमुळे गणेशोत्सवाला सकारात्मक दिशा मिळत असून, मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी आगामी काळातही विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी संजय मुलमुले, जिल्हा उपाध्यक्ष भाजपा व माजी नगराध्यक्ष; दिलीप देशमुख; रजत गजभिये, शहराध्यक्ष भाजपा तथा नगरसेवक; अलोक मानकर, उपाध्यक्ष; उमेश पटले; धर्मेंद्र शुक्ला; प्रभाकर खेडकर; मीनल भारंबे; कविता मुलमुले; अर्चना ठक्कर यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## भारतातील प्लास्टिक नोटांसंदर्भात नवी अपडेट

**नवी दिल्ली** : भारतात लवकरच चलनात प्लास्टिकच्या नोटा पाहायला मिळू शकतात. आरबीआयनं १० आणि २० रुपयांच्या प्लास्टिकच्या नोटांची फील्ड ट्रायल करण्याची तयारी सुरु केली आहे. प्लास्टिकच्या चलनासाठी आवश्यक सामग्रीच्या पुरवठ्यासाठी कंपन्यांकडून प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. या प्रकल्पासाठी भारतातील कंपनी UFlex आणि अमेरिकेच्या Spectra सिस्टीमसह मिळून बोली जमा केली आहे. सरकारनं १० आणि २० रुपयांच्या प्लास्टिकच्या नोटांच्या फील्ड ट्रायलला मंजुरी दिलेली आहे. पॉलिमर नोटांचा वापर जगभरातील काही देशांकडून करण्यात येत आहे. कागदी नोटांच्या तुलनेत प्लास्टिकच्या नोटा अधिक टिकाऊ मानल्या जातात. आरबीआयनं प्लास्टिक नोटांचा प्रकल्प काही वर्षांपूर्वी आणला होता. आता पुन्हा एकदा भारतात प्लास्टिकच्या नोटांचा प्रायोगिक तत्वावर पुन्हा प्रयोग सुरु केला जाणार आहे.

# दशरथ किटुकले यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने, वाघाच्या हल्ल्याची चर्चा ठरली अफवा

## झिलबोडीतील संशयास्पद मृत्यूचे गूढ उकलले

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

तालुक्यातील झिलबोडी येथे शेतात संशयास्पद अवस्थेत मृत आढळलेल्या दशरथ दामोधर किटुकले (३६) यांच्या मृत्यूचे गूढ अखेर उकलले आहे. नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात करण्यात आलेल्या शवविच्छेदनाच्या अहवालानुसार त्यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे वाघाच्या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाल्याच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

दशरथ किटुकले शनिवारी सकाळी पन्हाटीच्या शेतात डवरणीसाठी बैल घेऊन गेले होते. दिवसभर शेतात काम केल्यानंतर सायंकाळी सुमारे सहा वाजता ते बैल घेऊन घरी परतणार होते. मात्र, ते घरी न परतल्याने कुटुंबीयांनी शेतात शोध घेतला. त्यावेळी पिकात त्यांचा मृतदेह आढळून आला. मृतदेहाच्या हातापायांवर खरचटल्याच्या खुणा, तोंडातून रक्तस्राव तसेच चेहरा काळवंडलेला दिसून आल्याने त्यांच्या मृत्यूबाबत संशय निर्माण झाला. परिसरात वाघाच्या





हल्ल्याची चर्चा सुरू झाल्याने वन विभाग आणि पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली.

उमरेड दक्षिण प्रादेशिक वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी विवेक आंबटकर पथकासह घटनास्थळी दाखल झाले. भिवापूरचे ठाणेदार रविंद्र मस्कर तसेच फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईपर्यंत वाघाच्या हल्ल्याची शक्यता तपासण्यात येत होती.

**नागपूर मेडिकलमध्ये शवविच्छेदन**

मृतदेहाची अवस्था पाहता मृत्यूचे कारण निश्चित करण्यासाठी भिवापूर ग्रामीण रुग्णालयाऐवजी मृतदेह नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. शवविच्छेदन अहवाल पोलिसांना प्राप्त झाला असून, त्यात हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. शवविच्छेदन अहवालामुळे वाघाच्या हल्ल्यासह मृत्यूबाबत सुरू असलेल्या विविध तर्क-वितर्कांना आता पूर्णविराम मिळाला आहे. शेतात काम करत असताना अचानक हृदयविकाराचा झटका आल्याने दशरथ किटुकले यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## विदर्भ आयटी प्रीमियर लीग डे-नाईट क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### 'मिस अर्थ इंडिया २०२६' आर्या अवधूत यांची विशेष उपस्थिती, सेंट मेरी मैदानावर क्रिकेटचा थरार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

क्रीडाप्रेमींसाठी उत्साहाची पर्वणी ठरलेल्या विदर्भ आयटी प्रीमियर लीग डे- नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन ३ व ४ ऑक्टोबर रोजी नागपूर येथील सेंट मेरी मैदानावर करण्यात आले. या स्पर्धेत क्रिकेटचा थरार, खेळाडूंचे उत्कृष्ट कौशल्य आणि क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण मैदानावर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. दिवस-रात्र खेळविण्यात आलेल्या या स्पर्धेने क्रिकेट प्रेमींना रोमांचक सामन्यांची पर्वणी अनुभवण्याची संधी उपलब्ध करून दिली.

या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे मिस अर्थ इंडिया २०२६ आर्या अवधूत यांची विशेष अतिथी म्हणून लाभलेली उपस्थिती. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेच्या उत्साहात आणखी भर पडली. क्रीडा आणि मनोरंजन यांचा सुरेख संगम साधणाऱ्या या आयोजनामुळे उपस्थितांमध्ये विशेष उत्सुकता पाहायला मिळाली. विदर्भातील आयटी क्षेत्रातील तसेच इतर क्रिकेटप्रेमी खेळाडूंना आपले क्रीडाकौशल्य दाखविण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्यातील क्रीडा भावना





वाढविणे आणि क्रिकेटच्या माध्यमातून परस्परांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध दृढ करणे, हा या स्पर्धेच्या आयोजना मागील उद्देश होता. खेळाडूंना आपली प्रतिभा सिद्ध करण्याची संधी मिळावी, तसेच स्थानिक पातळीवर क्रिकेटला प्रोत्साहन मिळावे, या दृष्टिकोनातून आयोजकांनी या स्पर्धेचे नियोजन केले होते. या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक म्हणून सॅमसंग कंपनी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच विदर्भ व मध्य प्रदेशचे क्षेत्रीय विक्री व्यवस्थापक रितेश विलायतकर यांचे विशेष सहकार्य या स्पर्धेला लाभले. प्रायोजकांचे सहकार्य आणि आयोजकांचे नियोजन यामुळे स्पर्धेचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. डे-नाईट स्वरूपात आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत दिवसा आणि रात्रीच्या प्रकाशझोतात क्रिकेटचा आनंद अनुभवण्याची संधी क्रिकेटप्रेमींना मिळाली. मैदानावर खेळाडूंनी केलेल्या उत्कृष्ट फलंदाजी, प्रभावी गोलंदाजी आणि चुरशीच्या सामन्यांमुळे स्पर्धेत रंगत निर्माण झाली. प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी विजयासाठी केलेले प्रयत्न आणि दाखविलेली जिद्द यामुळे उपस्थित प्रेक्षकांचा उत्साह कायम राहिला.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी कमिटी मेंबर अभिषेक रेंघे, राहुल शर्मा, मंगू सिंह, दिनेश सिंह, गणेश सोनटक्के, नरेश झाडे, पंकज रडके, युवराज ठवकर, सत्कार मांडवगडे आणि प्रणय घुघरे यांनी विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेच्या नियोजनापासून ते प्रत्यक्ष आयोजनापर्यंत सर्वांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. आयोजकांनी स्पर्धेसाठी जय्यत तयारी केली होती. मैदानाची व्यवस्था, सामन्यांचे नियोजन आणि खेळाडूंसाठी आवश्यक सुविधा यांवर विशेष लक्ष देण्यात आले. त्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे ही स्पर्धा क्रीडा प्रेमींसाठी आकर्षणाचे केंद्र ठरली. विदर्भ आयटी प्रीमियर लीगच्या माध्यमातून स्थानिक क्रिकेटपटूंना प्रोत्साहन मिळण्या सोबतच नागपूरच्या क्रीडा संस्कृतीला नवी ऊर्जा मिळाली.

क्रिकेटच्या माध्यमातून एकत्र येण्याची संधी मिळाल्याने खेळाडू आणि प्रेक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. क्रिकेट 'प्रेमी तसेच क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे या स्पर्धेचे आयोजन यशस्वी ठरले. भविष्यात अशा स्पर्धांच्या माध्यमातून अधिकाधिक खेळाडूंना संधी मिळावी आणि नागपूरसह विदर्भात क्रिकेटचा प्रसार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त पोरवाल महाविद्यालयात ग्रंथदिंडीचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याच्या गौरवशाली पार्श्वभूमीवर ३ ऑक्टोबर हा अभिजात मराठी भाषा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निमित्ताने सेठ केसरिमल पोरवाल महाविद्यालय, कामठी येथील कनिष्ठ महाविद्यालय परिसरात ३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता ह्यग्रंथदिंडीह्णचे आयोजन करण्यात आले मराठी भाषेची समृद्ध साहित्यिक व सांस्कृतिक परंपरा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, वाचनाची आवड निर्माण करणे आणि मराठी भाषेविषयी अभिमानाची भावना जागृत करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. आशिष क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, मराठी विभागप्रमुख डॉ. नीता वानखेडे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते होते. या कार्यक्रमाला प्रा. महेश जोगी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. स्वप्निल दहाट, उपप्राचार्य प्रा डॉ इप्तिकार हुसेन,प्रा. विश्वनाथ वंजारी सर आणि पर्यवेक्षक प्रा. नरेंद्र मेंढे सर यांच्या प्रमुख उपस्थिती लाभली ग्रंथदिंडी चे आयोजन करण्यात प्रा ज्ञानेश्वर रेवतकर,प्रा मासुरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. मराठी भाषा हीच आपली अभिजात ओळख या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या ग्रंथदिंडीत शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# जागतिक संस्कृत परिषदेत नागपूरच्या तृप्ती शेळके (उमाळे) यांच्या संशोधनाची विशेष दखल

### थायलंड येथे आयोजित पाचव्या जागतिक संस्कृत परिषदेत संशोधनपर निबंधाला विशेष प्रशंसा; भारतीय ज्ञानपरंपरा आणि आधुनिक शिक्षणाचा प्रभावी संगम मांडला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय संस्कृती, संस्कृत भाषा आणि प्राचीन ज्ञानपरंपरेचा आधुनिक शिक्षणाशी असलेला अनुबंध जागतिक स्तरावर अधोरेखित करत नागपूरच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव वाढविणारी उल्लेखनीय कामगिरी भवन्स बी.पी.विद्या मंदिर, त्रिमूर्तीनगर येथील संस्कृत शिक्षिका श्रीमती तृप्ती शेळके (उमाळे) यांनी केली आहे. थायलंड येथे आयोजित पाचव्या जागतिक संस्कृत परिषदेत त्यांनी सादर केलेल्या संशोधनपर निबंधाची विशेष दखल घेण्यात आली असून, त्यांच्या संशोधनात्मक मांडणीला विशेष प्रशंसा प्राप्त झाली आहे. त्यांच्या या यशामुळे नागपूरच्या शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. थायलंड येथे आयोजित या आंतरराष्ट्रीय परिषदेत विविध देशांतील संस्कृत अभ्यासक, संशोधक, प्राध्यापक आणि विद्वान सहभागी झाले होते.

संस्कृत भाषा, भारतीय तत्त्वज्ञान, प्राचीन ज्ञानपरंपरा तसेच आधुनिक काळातील संस्कृतच्या उपयुक्ततेवर या परिषदेत विविध विषयांवर विचारमंथन करण्यात



आले. अशा प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नागपूरच्या शिक्षिकेला आपले संशोधन सादर करण्याची संधी मिळणे ही विशेष अभिमानाची बाब ठरली आहे. तृप्ती शेळके (उमाळे) यांनी 'संस्कृतवाङ्मये निहितानां भारतीय ज्ञानपरम्परातत्त्वानां समकालीन शिक्षणे पुनःसंदर्भीकरणम्' अर्थात 'संस्कृत वाङ्मयातील भारतीय ज्ञानपरंपरेतील तत्त्वांचे समकालीन शिक्षणात पुनर्संदर्भीकरण' या महत्त्वपूर्ण विषयावर आपला संशोधनपर निबंध सादर केला. संस्कृत वाङ्मयामध्ये समृद्ध स्वरूपात उपलब्ध असलेल्या भारतीय ज्ञान परंपरेतील तत्त्वांचा आधुनिक शिक्षण व्यवस्थेत कशा प्रकारे प्रभावीपणे उपयोग करता येईल, याचे सखोल विवेचन त्यांनी आपल्या संशोधनातून केले. प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये ज्ञानाला केवळ माहिती मिळविण्याचे साधन न मानता व्यक्तिमत्त्व विकास, चारित्र्य निर्मिती, नैतिक मूल्यांची जोपासना आणि समाज कल्याणाचे माध्यम मानले गेले आहे.

वेद, उपनिषदे, भगवद्गीता तसेच विविध संस्कृत ग्रंथांमध्ये जीवनमूल्ये, तत्त्वज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवी संबंध आणि सामाजिक जबाबदारी यांसंदर्भातील मौलिक विचार आढळतात. या विचारांचा आजच्या शिक्षणपद्धतीशी समन्वय साधल्यास विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळू शकते, हा महत्त्वाचा दृष्टिकोन त्यांनी आपल्या संशोधनातून मांडला.

आजच्या बदलत्या शैक्षणिक परिस्थितीत विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देणे पुरेसे नसून त्यांच्यामध्ये चिकित्सक विचारक्षमता, सर्जनशीलता, नैतिक जाणीव, सामाजिक बांधिलकी आणि आत्मविश्वास विकसित करणे आवश्यक आहे. संस्कृत वाङ्मयातील ज्ञानसंपदा आधुनिक अध्यापन पद्धतींशी जोडून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, नैतिक आणि सामाजिक विकासासाठी कशी उपयोगी ठरू शकते, याची विविध अंगांनी त्यांनी चर्चा केली. भारतीय ज्ञानपरंपरेचा आधुनिक शिक्षणाशी योग्य समन्वय साधल्यास विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षणाची रुजवण, वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना आणि भारतीय संस्कृती विषयी अभिमानाची भावना निर्माण होण्यास मदत होऊ शकते. प्राचीन ज्ञानाचा केवळ गौरव करण्याऐवजी त्यातील उपयुक्त तत्त्वांचा वर्तमान काळातील शैक्षणिक गरजांनुसार पुनर्विचार आणि पुनर्वापर करणे महत्त्वाचे आहे, हा त्यांच्या संशोधनाचा प्रमुख आशय होता. त्यामुळे त्यांच्या निबंधाला शैक्षणिक आणि संशोधनात्मक दृष्टिकोनातून विशेष महत्त्व प्राप्त झाले. या आंतरराष्ट्रीय परिषदेत विविध देशांतील विद्वान आणि संशोधकां समोर आपले संशोधन सादर करतांना तृप्ती शेळके (उमाळे) यांनी संस्कृत वाङ्मयातील विचारांची आधुनिक संदर्भातील उपयुक्तता प्रभावीपणे स्पष्ट केली. त्यांच्या विषयाची निवड, संशोधनाची मांडणी आणि शिक्षणक्षेत्राशी असलेली त्याची सांगड यांचे विशेष कौतुक करण्यात आले. त्यांच्या संशोधनपर निबंधाची विशेष प्रशंसा करून त्यांच्या शैक्षणिक योगदानाची दखल घेण्यात आली.

परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यात भारताचे थायलंड मधील राजदूत पुनीत अग्रवाल आणि पद्मश्री डॉ. चिरापत प्रपनविद्या यांच्या हस्ते श्रीमती तृप्ती शेळके (उमाळे) यांचा सत्कार करण्यात आला. आंतरराष्ट्रीय स्तरावरील या मान्यवरांच्या हस्ते झालेला सन्मान त्यांच्या संशोधन कायासाठी महत्त्वपूर्ण गौरव ठरला. जागतिक संस्कृत परिषदेचे अध्यक्ष राजेश मिश्रा तसेच अन्य तज्ज्ञ आणि संशोधकांनी त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदन करून पुढील संशोधनासाठी शुभेच्छा दिल्या. या यशामागे भवन्स बी. पी. विद्या मंदिर, त्रिमूर्तीनगरच्या प्राचार्या सौ.पार्वती जी.अय्यर यांचे विशेष योगदान असल्याचे सांगण्यात आले. त्यांनी तृप्ती शेळके (उमाळे) यांना सातत्याने मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सहकार्य केले.

शिक्षकांना अध्यापना बरोबरच संशोधना साठी प्रेरित करणारे शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यात संस्थेची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. त्यांच्या या प्रोत्साहनामुळे तृप्ती शेळके यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले संशोधन सादर करण्याची संधी मिळाली. संस्कृत ही केवळ प्राचीन भाषा नसून भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान, साहित्य आणि ज्ञानपरंपरेचा अमूल्य वारसा आहे. या भाषेतील ज्ञान आधुनिक काळातील शिक्षण, विज्ञान, सामाजिक विचार आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी कसे उपयुक्त ठरू शकते, याचा अभ्यास आणि प्रसार होणे काळाची गरज आहे. तृप्ती शेळके (उमाळे) यांच्या संशोधनामुळे या विचारांना आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ मिळाले असून, संस्कृतच्या अभ्यासाला आधुनिक शैक्षणिक संदर्भ जोडण्याच्या प्रयत्नांना नवी दिशा मिळाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेतील सहकारी शिक्षकवृंद, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर आणि परिचितांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यातही त्यांच्याकडून अशाच प्रकारचे संशोधनकार्य घडावे आणि भारतीय ज्ञानपरंपरेचा जागतिक स्तरावर अधिक व्यापक प्रसार व्हावा, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत. थायलंडमधील जागतिक संस्कृत परिषदेत मिळालेली विशेष प्रशंसा ही केवळ तृप्ती शेळके (उमाळे) यांची वैयक्तिक उपलब्धी नसून नागपूरच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी आणि भारतीय ज्ञानपरंपरेच्या जागतिक प्रसारासाठी अभिमानास्पद ठरणारी कामगिरी आहे.

थोडक्यात

## 'खिलते हैं गुल यहाँ...' हिंदी-मराठी सदाबहार गीतांनी सजली संगीत संध्या



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्वरकमल संगीत अकादमीच्यावतीने 'खिलते हैं गुल यहाँ...' या विशेष हिंदी-मराठी सदाबहार गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक हॉलमध्ये करण्यात आले. हिंदी आणि मराठी संगीतविश्वातील लोकप्रिय व सदाबहार गीतांच्या मनमोहक सादरीकरणाने संगीतप्रेमींना सुरांची अविस्मरणीय सफर घडवली. 'ऐसा समा ना होता' या सामुहिकरीत्या सादर केलेल्या गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली.

यानंतर अरुंधती मांडवगणे यांनी जाने क्या बात है, वादळ वारं सुटलं गं; कल्पना कुणावार यांनी काँटो से खींच के, येऊ कशी प्रिया; विभा चौहान यांनी रसिक बलमा, ये जवळी घे जवळी; दीपाली पनके यांनी मेरे महबूब न जा, बाई बाई मनमोराचा; शिल्पा खानझोडे यांनी दिल विल प्यार व्यार, जांभूळ पिकला झाडाखाली; डॉ. प्राची पातुरकर यांनी जिया ले गयो, चंद्रा; सीमा सोनुले यांनी जा रे जा ओ हरजाई, कशी रे तुला भेटू; प्राची दाणी यांनी मेरा दिल ये पुकारे आणि हृदयी जागा तू अनुरागा; स्मिता बेंद्रे यांनी खिलते हैं गुल यहाँ, का रे दुरावा; रेणु कुंभारे यांनी जाने क्या तूने कही; अंजली महा यांनी ना तुम हमें जानो; आरती बकाल यांनी बिंदिया चमकेगी, वारा गाई गाणे आणि डॉ. मंजिरी अय्यर यांनी श्रावणाचं ऊन अशी एकापेक्षा एक सरस गीते सादर करून वातावरण सुरेल केले.

गायकांना संगीताची साथ महेंद्र ढोले, गौरव टांक साळे, अशोक टोकलवार, पंकज यादव, अक्षय हरले, अभिषेक, गुलशन आणि राजेश अमीन यांनी दिली. कार्यक्रमाची संकल्पना स्वरकमलच्या संचालिका डॉ. मंजिरी अय्यर यांची होती. संगीत संयोजन महेंद्र ढोले यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. सोनाली बिरेवार यांनी केले. हिंदी-मराठी गीतांच्या या सुरेल संगमाने उपस्थित संगीतप्रेमींना मनोरंजनासोबतच जुन्या सदाबहार गीतांच्या मधुर आठवणींमध्ये रमवले. उत्स्फूर्त प्रतिसाद, टाळ्यांचा कडकडाट आणि संगीतप्रेमींच्या मोठ्या सहभागामुळे ही संगीतमय संध्या यशस्वी ठरली.

## सदाबहार गीतांनी सजली 'बर्मन बिट्स'ची सुरेल मैफल

### गौरी शिंदे म्युझिक अकादमीतर्फे आर. डी. बर्मन आणि एस. डी. बर्मन यांच्या सुपरहिट गीतांची संगीतमय मेजवानी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गौरी शिंदे म्युझिक अकादमीतर्फे सदाबहार गीतांवर आधारित विशेष कार्यक्रम बर्मन बिट्स या आर. डी. बर्मन आणि एस. डी. बर्मन यांच्या सुपरहिट गीतांचा कार्यक्रम शुक्रवारी साई सभागृह येथे आयोजित करण्यात आला. हिंदी चित्रपटसृष्टीला आपल्या अविस्मरणीय संगीताने समृद्ध करणाऱ्या आर. डी. बर्मन आणि एस. डी. बर्मन यांच्या लोकप्रिय व सदाबहार गीतांची सुरेल प्रस्तुती यावेळी करण्यात आली. या दोन्ही दिग्गज संगीतकारांच्या लोकप्रिय गीतांना गौरी शिंदे म्युझिक अकादमीच्या गायक कलाकारांनी आपल्या सुमधुर आवाजाने सादर करून संध्याकाळ संस्मरणीय केली. कार्यक्रमाचे दिग्दर्शन गौरी शिंदे यांनी केले. याप्रसंगी अशोक शहारे, वैशाली खराळकर, निशा गुडधे, महेश गुडधे, डॉ. मुग्धा बोरसे, आनंद ढोबळे, सतीश भुरले, कमलेश गुमले, अपर्णा गुमले, डॉ. वीरेंद्र उन्नरकर, रामकृष्ण चिंतमवार, कृष्णाजी इंगोले, संजय पुल्लरवार, डॉ. अजय काळे, कीर्तिमालिनी काळे, अरुण पेटकर, अभय ए. पी., कविता रोकडे, शालिनी निमजे, मनोज निमजे, अभय बेलसरे, प्रथमेश बोबडे, अरुण मोहगावकर, शेखर झाडगांवकर, राजेंद्र पिंजरकर, अमोल बारस्कर, शशिकांत मोहिते, पुष्पा भेंडे, शुभांगी बेलसरे, डॉ. चंदना वानखेडे, अनुप हांडा, ॲड. सुधाकर भोळे, रत्ना भोळे, हर्षा घुसे, शिवानी समृतवर, सृष्टी भांडवलकर, स्नेहल रागीट, सीमा तांबे आणि दिलीप ढोबळे यांनी गायक कलाकार म्हणून सहभाग घेतला.

त्यांनी ये शाम मस्तानी, ये दिल ना होता, अब तो है तुमसे, ओ मेरे दिल के, रात कली एक ख्वाब, दिलबर मेरे, रात का समा, एक अजनबी हसीना से, तुमने मुझे देखा, सागर किनारे, तूने ओ रंगीले, याद आ रही है, पूछो ना कैसे, ये लड़का हाय अल्ला, दिवाना लेके आया है, किसका रस्ता देखे, जय जय शिवशंकर, खिलते हैं गुल यहाँ, पिया बावरी यांसह अनेक लोकप्रिय गीतांची प्रस्तुती करण्यात आली. उपस्थित रसिकांनी कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेत कलाकारांच्या सादरीकरणाचे कौतुक केले आणि उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## धरणात बुडून तिघांचा मृत्यू

**वृत्तसंस्था, नाशिक**

नाशिक जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. मालेगाव तालुक्यातील कजवाडे येथे सातवडे धरणात बुडून एकाच



कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. दुपारी साडेतीनच्या सुमारास ही घटना घडली. भूषण रघुनाथ कर्नर (वय १३), हरी बाबू गोयेकर (वय २८) आणि बाबू घुटा गोयेकर (वय ५४) अशी मृतांची नावे आहेत. या घटनेमुळे कजवाडे गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तिघेही मेंढ्यांना पाणी पाजण्यासाठी तसेच धुण्यासाठी सातवडे धरणावर गेले होते. दुपारी साडेतीनच्या सुमारास भूषण कर्नर याला धरणातील पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो खोल पाण्यात बुडाला. त्याला वाचवण्यासाठी हरी गोयेकर हे पाण्यात उतरले. मात्र, तेही पाण्यात बुडाले. ही घटना लक्षात आल्यानंतर मदतीसाठी गेलेले बाबू गोयेकर हेही पाण्यात बुडाले. काही वेळातच तिघेही पाण्यात बुडाल्याने त्यांचा दुदैवी मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेने गावावर शोककळा पसरली आहे.

# आयसीडीएसच्या ५१ वर्षांच्या योगदानानंतरही अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा नाही! सिटू संघटना

### केंद्र व राज्य सरकारच्या दुर्लक्षामुळे लाखो अंगणवाडी कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष; मूलभूत सुविधा, योग्य मानधन आणि बालकांच्या पोषणासाठी सी.आय.टी.यू.संघटनेचा संघर्ष सुरूच

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

देशातील माता, बालके आणि किशोरवयीन मुलींच्या आरोग्य, पोषण व शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या एकात्मिक बाल विकास सेवा (आयसीडीएस) योजनेला २ ऑक्टोबर रोजी ५१ वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या पाच दशकांहून अधिक काळापासून अंगणवाडी सेविका आणि मदतनीस ग्रामीण तसेच शहरी भागातील लाखो कुटुंबांपर्यंत पोषण, आरोग्य आणि पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या सेवा पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. मात्र, एवढ्या प्रदीर्घ कालावधी नंतरही अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळालेला नाही. केंद्र आणि राज्य सरकारकडून त्यांच्या योगदानाची अपेक्षित दखल घेतली जात नसल्याची खंत अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या महाराष्ट्र अध्यक्षा कॉ. शशी काळे यांनी व्यक्त केली. कॉ. शशी काळे म्हणाल्या की, आयसीडीएस योजनेच्या माध्यमातून अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी देशाच्या मानवी विकासात मोलाची भूमिका बजावली आहे. पोलिओ निर्मूलन आणि विविध लसीकरण मोहिमांमध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला.

कुपोषण कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. माता आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी आरोग्य यंत्रणेला सहकार्य केले. तसेच समाजात पूर्वप्राथमिक शिक्षणाचे महत्त्व रुजविण्याबरोबरच बालक, माता, किशोरवयीन मुली आणि महिलांच्या पोषण व आरोग्याबाबत जनजागृती करण्याचे कामही त्यांनी केले आहे.




ग्रामीण आणि शहरी भागातील लाखो कुटुंबांपर्यंत पोषण, आरोग्य आणि शिक्षणाच्या सेवा पोहोचविण्यात अंगणवाडी केंद्रांची महत्त्वाची भूमिका आहे. विशेषतः ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना शालेय शिक्षणापूर्वी आवश्यक असलेले शिक्षण, संस्कार आणि विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम अंगणवाडी केंद्रे करतात. बालकांच्या सर्वांगीण विकासाचा पाया मजबूत करण्यासाठी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस सातत्याने परिश्रम घेत आहेत. असे असतानाही या कर्मचाऱ्यांना अद्याप शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळालेला नाही, ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. आयसीडीएसच्या सुवर्ण महोत्सवी टप्प्यानंतरही केंद्र आणि राज्य सरकारकडून अंगणवाडी कर्मचारी व त्यांच्या योगदानाचा अपेक्षित स्तरावर गौरव करण्यात आलेला नाही. या ऐतिहासिक वाटचालीच्या निमित्ताने विशेष उपक्रम, सन्मान आणि कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी ठोस निर्णय अपेक्षित होते. मात्र, या बाबतीत सरकारने पुरेसे गांभीर्य दाखविले नसल्याने लाखो अंगणवाडी कर्मचारी आणि मदतनीसांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचे संघटनेने स्पष्ट केले. अनेक अंगणवाडी केंद्रांमध्ये आजही मूलभूत सुविधांचा अभाव आहे. आवश्यक पायाभूत सुविधा, पुरेशी साधनसामग्री आणि कामासाठी अनुकूल वातावरण नसतानाही कर्मचाऱ्यांना विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत आहेत. बालकांच्या पोषणापासून ते आरोग्यविषयक जनजागृती आणि शैक्षणिक उपक्रमांपर्यंत अनेक कामे अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून राबविली जातात. मात्र, त्यांच्या कामाच्या तुलनेत मिळणाऱ्या सुविधा आणि शासनाकडून मिळणाऱ्या सन्मानाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असल्याचे संघटनेने सांगितले.

**निकृष्ट पोषण आहारामुळे कुपोषणाचा प्रश्न गंभीर**

बालकांना योग्य आणि दर्जेदार पोषण आहार मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. मात्र, अंगणवाडी केंद्रांमधून वितरित करण्यात येणाऱ्या टीएचआर (टेक होम रेशन) अर्थात घरपोच पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. निकृष्ट दर्जाच्या पोषण आहारामुळे बालकांच्या पोषणाचा प्रश्न सुटण्याऐवजी अधिक गंभीर होण्याची भीती संघटनेने व्यक्त केली. बालकांना पुरेसा आणि दर्जेदार आहार मिळणे आवश्यक असताना पोषण आहाराच्या गुणवत्तेसाठीही कर्मचाऱ्यांना संघर्ष करावा लागत आहे. ताज्या आहाराचा दर्जा सुधारण्याबरोबरच पोषण आहाराच्या वितरणात सुधारणा करणे गरजेचे आहे. बालकांचे कुपोषण कमी करण्यासाठी केवळ योजना राबविणे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि आहाराच्या गुणवत्तेवर सातत्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

**अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा देण्याची मागणी**

गेल्या ५१ वर्षांपासून देशाच्या सामाजिक आणि मानवी विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीसांना अद्याप शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळालेला नाही. त्यामुळे त्यांच्या कामाचे स्वरूप, जबाबदाऱ्या आणि सामाजिक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. केंद्र व राज्य सरकारने अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांना शासकीय दर्जा द्यावा, त्यांच्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा करावी आणि अंगणवाडी केंद्रांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे कार्य केवळ बालकांना पोषण आहार देण्यापुरते मर्यादित नसून माता-बाल आरोग्य, लसीकरण, पूर्वप्राथमिक शिक्षण, कुपोषण प्रतिबंध आणि सामाजिक जनजागृती अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. या व्यापक जबाबदाऱ्या पार पाडताना कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांकडे सरकारने केवळ योजनांच्या अंमलबजावणीतील मनुष्यबळ म्हणून न पाहता, देशाच्या विकासातील महत्त्वाचा घटक म्हणून पाहावे, असे आवाहन संघटनेने केले.

# पैठणमध्ये भीषण अपघातात लेक-पित्यासह तीन ठार

**छत्रपती संभाजीनगर** : राज्य परिवहन महामंडळाची बस व दुचाकी वाहनामध्ये झालेल्या एका भीषण अपघातात पाच वर्षांच्या चिमुकलीसह तिघांचा मृत्यू झाला. ही घटना पैठण शहरातील नाका टू नाका या रस्त्यावर रविवारी दुपारी ३ च्या सुमारास घडली.



कृष्णा अशोक गायकवाड (वय २५, रा. राक्षी ता. शेवगाव), छकुली कृष्णा गायकवाड (वय ५) व अशोक रमेश भालेराव (३५ रा. अंतरवाली जालना) अशी मृतांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, कृष्णा गायकवाड आणि अशोक भालेराव हे दुचाकीवरून पैठण येथे आले होते. ते परत गावी जात असताना त्यांच्या दुचाकीची व बस धडक झाली. हा अपघात इतका भीषण होता की तिघांचाही जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत तिघांनाही नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या तिघांनाही मृत घोषित केले. या घटनेमुळे नांदर आणि जालना परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघाताची नोंद करण्याची प्रक्रिया पोलिसात रविवारी रात्रीपर्यंत सुरू होती. पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## सेवा परमो धर्म : हे डॉक्टर पी. एस. रामाणींच्या आयुष्याचे ब्रीदवाक्य : रवींद्र मालुसरे




**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

आजच्या काळात अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत; परंतु त्या सुविधा प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचणे ही तितकीच महत्त्वाची बाब आहे. अनेक वेळा आर्थिक अडचणी, माहितीचा अभाव किंवा योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे सामान्य माणूस आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतो. परंतु सुप्रसिद्ध neurological &spine surgeon डॉ पी एस रामाणी हे गेली ५४ वर्षे सातत्याने एक दिवसाचा मेडिकल कॅम्प आयोजित करीत आहेत, शारीरिक दुःखाने उभे राहू न शकणाऱ्या 'पीडित माणसासाठी एक देव माणूस उभा राहतो' वैद्यकीय शिबिर ही केवळ तपासणीची व्यवस्था न राहता; ते आशेचे दार बनते. हा या भावनेचा एक सुंदर आविष्कार आहे असे मी समजतो असे भावपूर्ण उदगार मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी काढले.

सुप्रसिद्ध ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. पी. एस. रामाणी यांनी गरजू व्यक्तींना मदत व्हावी, त्यांना योग्य वैद्यकीय मार्गदर्शन मिळावे आणि आरोग्यसेवा त्यांच्या जवळ पोहोचावी, या उद्देशाने दादर हिंदू कॉलनी येथे शांता सिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने मोफत शिबिर आयोजित केले होते त्यावेळी मालुसरे बोलत होते. मालुसरे पुढे असेही म्हणाले की, डॉक्टर होणे ही एक मोठी गोष्ट आहे; पण आपल्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा उपयोग समाजातील गरजू व्यक्तींसाठी करणे, ही त्याहून मोठी सामाजिक जबाबदारी आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत एक सुंदर विचार आहे. सेवा परमो धर्मः रुग्णाला केवळ औषधाची गरज नसते; त्याला विश्वासाची, आपुलकीची आणि धीर देणाऱ्या शब्दांचीही गरज असते. 'ताठ कणा' हा चित्रपट ज्यांच्या जीवनावर बनला ते डॉ रामाणी या उपक्रमाच्या केंद्रस्थानी गरजू माणूस ठेवून वयाच्या ८८ व्या वर्षी स्वतःला तंदुरुस्त ठेवत आजही कार्यरत आहेत ही अधिक महत्त्वाची गोष्ट आहे. उपस्थित रुग्णांना सल्ला देताना डॉ. रामाणी म्हणाले की, आजारी पडल्यानंतर उपचार घेण्यापेक्षा आजाराची लक्षणे दिसताच तपासणी करून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका आणि आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची विशेष काळजी घ्या.

संस्थेचे सेक्रेटरी भूषण जाक यांनी आपल्या प्रास्ताविकात शांता सिद्धी चॅरिटेबल ट्रस्टच्या आजवरच्या सेवाभावी उपक्रमांचा आढावा घेतला. समाजातील एखाद्या व्यक्तीची वेदना कमी झाली, एखाद्या वृद्धाला पुन्हा व्यवस्थित चालता आले, एखाद्या रुग्णाच्या मनातील भीती कमी झाली तर त्या सेवेचे मूल्य पैशांत मोजता येत नाही आम्हालाही यात आनंद मिळतो. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ सुदेन्दु बाबुलकर, डॉ अनुज तिवारी, डॉ शिवम पाटील, डॉ ओमकार शिर्के, स्वाती सावंत, संतोष घाडगे, अजित मोहिते यांनी विशेष मेहनत घेतली.

# रुग्णालयातून परतल्यानंतर कौटुंबिक वाद पेटला, सासूच्या घराला आग लावण्याचा प्रयत्न

### चनकापूर जयभोले नगर मधील घटना, पत्नी, मुलांसह सासूने घेतला सुरक्षितस्थळी आश्रय

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

चनकापूर येथील जयभोले नगरात शनिवारी पहाटे सकाळच्या सुमारास कौटुंबिक कलहातून एका सैनिकाने सासूचे घर पेटवून देण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र खळबळ उडाली असून, भीतीपोटी पीडित महिला, तिची तीन लहान मुले आणि पिडिताच्या वृद्ध आईने नातेवाइकांकडे धाव घेत स्वतःचा बचाव केला..

प्राप्त माहितीनुसार, पुणे येथील बिहार बटालियनमध्ये कार्यरत असलेला सैनिक किशन साबू उईके (वय ३२) हा एका दिवसाच्या सुट्ट्यावर घरी आला होता. १ ऑक्टोबर रोजी त्याचे पत्नीसोबत संशयाचा सुईतून जोरदार भांडण झाले. या वादानंतर किशनने विष प्राशन केले, त्यानंतर त्याला आधी चिचोली प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि नंतर नागपूरच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले होते.

उपचारानंतर रुग्णालयातून सुटी मिळून घरी परतताच त्यांच्यात पुन्हा वाद पेटला. याप्रकरणी पत्नीने खापरखेडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. ठाण्यातही दोघांमध्ये खडाजंगी झाली. पतीने केलेल्या



मारहाणीचा आरोप करत पतीने विष प्राशन करण्याचा प्रकार निव्वळ बनाव असल्याचा संशय व्यक्त केला, तर दोघांमधील परस्पर अविश्वासामुळे हा वाद विकोपाला गेल्याचे बोलले जात आहे. शनिवारी पहाटे सकाळच्या सुमारास संतापलेल्या पतीने सासूच्या घरातील मुलांचे कपडे व इतर घरगुती साहित्य पेटवून दिले, ज्यामध्ये मोठे आर्थिक नुकसान झाले. आगीचे लोट दिसताच पत्नीने तत्काळ आपातकालीन ११२ क्रमांकावर फोन करून पोलिसांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली. कौटुंबिक सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषीवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# सायबर हल्ल्यांपासून बचावासाठी प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय : ऋषि मेहता

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सायबर गुन्हेगार अधिकाधिक अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा, विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून फसवणुकीचे नवे मार्ग शोधत आहेत. त्यामुळे सायबर सुरक्षा हा केवळ तांत्रिक विषय न राहता प्रत्येक व्यवसायासाठी प्राधान्याचा विषय झाला आहे, असे केंद्रीय गृह मंत्रालयाशी संबंधित सायबर सुरक्षा तज्ज्ञ ऋषि मेहता यांनी सांगितले. विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशनतर्फे एंटरप्राइज सायबर सिक्युरिटी अँड सायबर क्राईम या विषयावर आयोजित सत्रात ते बोलत होते.



सायबर गुन्हेगार सुरुवातीला सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेल्या माहितीचा वापर करतात. फेसबुक, इन्स्टाग्राम, फोन कॉल, एसएमएस आणि व्हॉट्सअप हे त्यांच्यासाठी सहज उपलब्ध मार्ग आहेत. ई-मेल, इंटरनेटला जोडलेली उपकरणे आणि असुरक्षित अप्लिकेशन्सचाही गैरवापर केला जातो. त्यामुळे डिजिटल व्यवहारांबाबत जागरूकता आणि शिस्तबद्ध वर्तन ही सायबर सुरक्षेची पहिली पायरी असल्याचे मेहता यांनी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून वरिष्ठ अधिकारी किंवा कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची बनावट ओळख निर्माण करून कर्मचाऱ्यांकडून तातडीने आर्थिक व्यवहार करून घेतले जाऊ शकतात. अशा वेळी मेकर-चेकर प्रणाली, स्वतंत्र माध्यमातून व्यवहाराची पडताळणी आणि संशयास्पद व्यवहारांसाठी कूलिंग-ऑफ कालावधी ठेवण्याचा सल्ला त्यांनी दिला. बनावट कर नोटिसा, जीएसटी संदेश, मालवेअर, पासवर्ड चोरी, पेमेंट सूचनांमध्ये फेरफार आणि म्यूल खात्यांद्वारे होणाऱ्या फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन त्यांनी केले. जीएसटी किंवा करसंदेशांची पडताळणी केवळ अधिकृत संकेतस्थळांवरूनच करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

संवेदनशील माहिती एआय प्लॅटफॉर्मवर टाकताना काळजी घेण्याचे आवाहन करून त्यांनी वार्षिक सायबर सुरक्षा ऑडिट, सायबर विमा, ऑफलाइन बॅकअप आणि नियमित सुरक्षा तपासणीची गरज व्यक्त केली. सायबर सुरक्षा हा हल्ल्यानंतरचा खर्च म्हणून पाहू नये. प्रतिबंध हाच सर्वात किफायतशीर उपाय आहे. मोठ्या सायबर हल्ल्यानंतर पुनर्प्राप्तीच्या खर्चापेक्षा पूर्वतयारीचा खर्च नेहमीच कमी असतो, असे मेहता म्हणाले. सायबर गुन्ह्यांचे वाढते संघटीकरण लक्षात घेता घटना घडताच तातडीने तक्रार करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

सायबर क्राईमच्या पोलीस उपायुक्त महक स्वामी यांनी व्हीएमएच्या उपक्रमाचे कौतुक करत जागरूकता आणि सतर्कतेचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी कामठी आर्मी कॅन्टोन्मेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण सावंदकर, ग्रामीणचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक अनिल मस्के यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. मिथिलेश जिंदाल यांनी सूत्रसंचालन केले, तर विनायक गावंकर यांनी समन्वय साधला.